शनिवार। ३ मार्च ७३
पन्नास पैसे
माणूस

# आमची फिर्याद
# कुणाची ? कुणाविरुद्ध ?

दुधाची तहान ताकावरसुद्धा नाही.
चक्क परदेशी भुकटचांवर आम्हाला भागवावी लागणार काय?
आज मुंबईकरांवर – उद्या सर्वांवर कोसळणाऱ्या
एका मूलभूत संकटाची जाणीव करून देणारा
यापुढचा, दहा मार्चचा
माणूस अंक

## दूध विशेषांक



संपादक
श्री. ग. माजगावकर

३ मार्च १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : एकूणचाळीस

## सप्रेम नमस्कार...

□ आपल्या २६ जानेवारीच्या विशेषांकात श्री. सु. ल. सोमण (माणूस प्रतिनिधी) यांनी घेतलेला 'विक्रोळी— एका जळत्या प्रकरणाचा स्वतंत्र शोध' प्रसिद्ध झाला आहे. हा 'स्वतंत्र शोध पूर्ण नव्हता; त्यात खूपच गोष्टी नमूद करावयाच्या राहून गेल्या होत्या. लेखाचा अभिनिवेष तर असा आहे, की विक्रोळी घटनेची वस्तुनिष्ठ व पूर्ण हकीगत वाचकांसमोर ठेवली गेली आहे. पण काही ठळक गोष्टी श्री सु ल. सोमणांच्या नजरेतून कशा सुटल्या (?) याचे आश्चर्य वाटते. उदाहरणार्थ—

१ : स्पेशल ब्रँच सहाय्यक आयुक्त पैंनी मनोहर जोशींना गोदरेज कॉलनीत न जाण्याचा सल्ला दिला होता. त्यांना गडबड होण्याचा धोका वाटत होता म्हणून. तरी मनोहर जोशी आपल्या निवडक सहकाऱ्यांसह कॉलनीत गेले. बाळ ठाकऱ्यांनी आपल्या मराठ्यातील मुलाखतीत मखलाशी करून असे सांगितले की, 'रात्री जाऊ नका म्हणून सांगितले होते.' ते काही असो पण पैंनी मनोहर जोशींना दिलेल्या या सल्ल्याचा व बाळ ठाकऱ्यांच्या 'मराठा' तील मुलाखतीचा (सोमणांनी घेतलेल्या मुलाखतीचा नव्हे) या वर्णनात उल्लेख नाही.

२ : २ सप्टेंबरची घटना घडल्यानंतर पोलीस आयुक्त श्री. प्रधान यांनी बोलावलेली पत्रकार परिषद रद्द केली. त्यामुळे घटनेची तपशीलवार हकीगत पत्रकारांना व त्यांच्यामार्फत जनतेला दिली गेली नाही. पोलीस आयुक्तांच्या असमर्थतेबद्दल वृत्तपत्रकारांनी श्री. शरद पवार यांना विचारणा केली. आणि 'मराठ्या'तील मुलाखतीच्या इतिवृत्ताप्रमाणे श्री. प्रधान म्हणाले, 'गृहराज्य-

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

मंत्री मुंबईस येत असताना धोरण-विषयक बाबी त्यांनी बोलणे उचित होय.' (वृत्तपत्र मुलाखत सत्य परिस्थितीचे दिग्दर्शनाकरिता नसून धोरणाच्या चौकटीत सत्य मांडण्याकरिता असते काय ?) असो. श्री. प्रधानांच्या या २६ ला झालेल्या मुलाखतीचा व नंतर झालेल्या श्री. शरद पवार यांच्या मराठातील मुलाखतीचा कुठेही उल्लेख नाही. '२ सप्टेंबर आणि नंतर' या शोधाच्या पाचव्या भागात या घटनांना काहीच स्थान नाही काय ?

३ : सु. ल. सोमण यांना एका पोलिसाने सांगितलेला आणि त्यांना 'ग्राह्य' वाटलेला एक तपशील असा, 'मी इथेच कामाला, त्यामुळे सर्वांना ओळखतो, पण त्या दंगलवाल्यात मला खूप चेहरे विक्रोळीबाहेरचे वाटत होते.' या पोलीसची स्मरणशक्ती भलतीच तीव्र असली पाहिजे. त्याशिवाय गोदरेज कॉलनीतले सगळे चेहरे लक्षात कसे राहणार ? आणि अशी त्याची स्मरणशक्ती जरी गृहीत धरली तरी अटक झालेल्यात गोदरेजचे कामगार किती आहेत व बाहेरचे किती आहेत याचा साधा शोध घ्यायचा प्रयत्नही या 'वस्तुनिष्ठ' चित्रात झाल्याचे दिसत नाही. तसेच अधून मधून कम्युनिस्टांना दुगाण्या झाडण्याऐवजी अटक झालेल्यात कम्युनिस्ट किती आहेत याचीही माहिती काढली असती तर बरे झाले असते.

४ : लेखाचा ध्वनी असा आहे की कामगारा-कामगारात मतभेद, फूट आहे आणि पडद्यामागील सूत्रधाराच्या कारस्थानाने असा हा (फूट पडलेला) कामगार भरडला गेला आहे. प्रत्यक्षात गोष्ट अशी, की गोदरेजच्या कामगारांनी अतिशय भक्कम अशी एकजूट वेळोवेळी दाखवली आहे आणि तशी एकजूट नसती तर १९ ऑक्टोबरचा संपूर्ण बंद, दत्ता सामंतांसाठी गोदरेज कामगारांनी काढलेला फंड, अटकेतील लोकांच्या कुटुंबांना व्यवस्थितपणे जाणारी आर्थिक मदत इ. गोष्टी झाल्या नसत्या. मुद्दा हा की यात मुख्य म्हणजे गोदरेज कामगारांच्या एकजुटीचा उल्लेखच नाही. खरं म्हणजे ही एकजूट कोणाच्याही नजरेतून सुटणं अशक्य होतं आणि शोध घेणाऱ्याच्या तर ती ताबडतोब लक्षात यायला हवी.

५ : '२ सप्टेंबर आणि नंतर'मध्ये एका अतिशय महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख पूर्णपणे टाळला आहे. ती गोष्ट म्हणजे कामगार ऐक्यवर्धक समितीची स्थापना. विक्रोळी प्रकरण संदर्भात या समितीला अतिशय महत्त्व होते (श्री. सोमणांना काही संघटना आणि व्यक्तींचं वावडं असावं नाहीतर या समितीचा उल्लेख कसा राहिला हे कळत नाही.) कमानी सर्व श्रमिक संघ, इंटकची काही युनिट्स व येथील इतर कामगार कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन ही समिती स्थापली होती. या समितीच्या सभा सुरू झाल्यावर एस्. आर. पीं.चा नंगानाच थांबला की नाही ? या समितीने या काळात २०–२५ सभा घेतल्या. सभा १५–२० हजारांच्या असत. चार चार तास

चालत. कित्येकदा रात्री ११ वाजेपर्यंत, पण यांतील एकाही सभेला एक वेषधारी पोलीस हजर नसे. आणि एकदाही सभेत गडबड, गोंधळ, दंगा, मारामाऱ्या झाल्या नाहीत. ही शिस्त, ही एकजूट, हा निर्धार यांचा उल्लेख पण मुद्दाम टाळल्यासारखा वाटतो.

६ : त्यानंतर अजून एका महत्त्वाच्या घटनेला साफ चाट दिली आहे. ती म्हणजे १९ ऑक्टोबरच्या संपाला काही महत्त्व नाही असं सु. ल. सोमणांना वाटतं काय ?

७ : १९ ऑक्टोबरला निघालेल्या प्रचंड मोर्चात श्री. व्ही. के. टेंबे यांनी 'दुष्काळासाठी मुख्यमंत्री निधीला पैसे द्या' असे म्हटल्याबरोबर कामगारांनी त्यांना पुढे बोलू दिले नाही. अखेर 'तुम्हाला हव ते करा' असं टेंब्यांना सांगावं लागलं. ही टेंब्यांची वा एकूणच इंटकच्या नेत्यांची उडालेली भंबेरी कशाचीच निदर्शक नाही काय ?

८ : 'या प्रकरणात पोलीस स्टेशन्स जाळण्याच्या धमक्या देण्यापर्यंतचे प्रयोग झाले' असं विधान करताना सु. ल. सोमणांनी दत्ता सामंत काय व कोणत्या संदर्भात म्हणाले याची निदान चौकशी तरी करायला हवी होती. 'कामगारांना जर निष्कारण हातकड्या पडणार असतील तर त्याचा निषेध करण्यासाठी मला कामगारांचा मोर्चा पोलीस स्टेशनवर घेऊन यावा लागेल व वेळ पडल्यास ते जाळावेही लागेल' अशा अर्थाचे ते उद्गार आहेत आणि तेसुद्धा कामगारांवर निष्कारण चाललेल्या दंडेलशाहीला उत्तर म्हणून ते काढलेले आहेत.

९ : अशाच प्रकारची विधाने श्री. यशवंत चव्हाण यांनी त्यावेळी झालेल्या सभांमध्ये केलेली आहेत आणि त्यासाठी सरकारने त्यांच्यावर खटले भरलेले आहेत हे सोमणांना माहितीच नाही ! शिवाय न्यायालयाच्या बदनामीचा खटला श्री. चव्हाण व श्री. यार्दी यांचेवर चालू आहे त्याचे काय ? हे खटले का उद्भवले.

१० : 'श्री. शरद पवारांनी दिलेल्या मुलाखतीमुळे न्यायालयाचा अवमान झाला' या मुद्द्यावर (कमानी एम्प्लॉईज युनियनचे) श्री. व्ही. एन्. लिमये यांनी ऐक्यवर्धक समितीचे निमंत्रक म्हणून श्री. शरद पवारांविरुद्ध केस केली आहे. याचाही सोमणांना पत्ता नाही !

'माणूस'सारख्या वस्तुनिष्ठतेबाबत अभिमान बाळगणाऱ्या नियतकालिकाने तरी काही गोष्टींबाबत कदर आणि जबाबदारी पाळावी अशी वाचकांची अपेक्षा असते. (ती पुरी होत असते की नाही याचा शोध 'माणूस'कार तरी घेतात की नाही ही शंकाच आहे.)

आपल्या याच विशेषांकात सत्याशी फारकत घेतलेला अजून एक लेख आहे. तो म्हणजे 'ही वाट एकट्याची !'

हल्ली काही सिद्धहस्त वाङ्मयवीर आपल्या भाषेची चौफेर टोलेबाजी करत फिरत असतात. त्यांपैकी आघाडीचे फलंदाज म्हणजे श्री. शिवाजी सावंत. विषय कोणताही असो. कर्ण वा

नाना पाटील. पौराणिक वा अगदी अलीकडील. यांच्या भाषेच्या या चौफेर टोलेबाजीत यांना ऐतिहासिक सत्याचेही भान रहात नाही. खरं म्हणजे त्याची त्यांना कदरच नसते. कर्णाविषयी लिहिताना ही भाषची टोलेबाजी खपून जाऊ शकते पण ह्या लेखाचा विषय नाना पाटील–अजून जिवंत आहे. इतिहासाचे दाखले उपलब्ध आहेत पण शिवाजी सावंतांना त्याच्याशी कर्तव्य नाही. ते आपल्या भाषाशैलीच्या गजरात धुंद होऊन गेले आहेत. पान ३६ वर ते लिहितात, 'सशस्त्र उठावाला हात घालावा म्हणून सुभाषचंद्रांनी काँग्रेसचे व्यासपीठ सोडले.' ही बोलकी घटना इतिहासात घडल्याची कुठेच नोंद नाही, (माणूस सोडून !) जरा इतिहासाची पुस्तकं चाळली तर या शिवाजी महाराजांच्या हे लक्षात आलं असतं की काँग्रेस श्रेष्ठींनी सुभाषचंद्रांना ६ वर्षं संघटनेतून हाकललेलं होत, आणि हा बंगालचा 'सूर्यपेट, तडफदार, पुरुषी शिवाजी' सशस्त्र उठावासाठी गेला नव्हता. 'माणूस' हे एक प्रतिष्ठित साप्ताहिक आहे, तुमच्या संग्रही नेहरूंनी संपादित केलेले 'बंच ऑफ ओल्ड लेटर्स' असेल. ती पत्रं जरी चाळली असती तरी इतिहास खरा काय आहे हे कळलं असतं, पण भाषेच्या टाळ मृदुंगात धुंद झालेल्या शिवाजी सावंतांना त्याची गरज भासत नाही आणि संपादकांना अशी ऐतिहासिक चूक आपल्या साप्ताहिकात चालते !

तसेच पान ३८ वर, 'निवडणुका झाल्या. मी खासदार म्हणून निवडून आलो. पहिली पाच वर्षं जनतेच्या प्रश्नावर आकांताने झगडलो' इत्यादी इत्यादी.

या निवडणुका किती सालच्या ? पत्ता नाही. पुढील मजकूरावरून त्या १९५२ सालच्या असाव्यात असे वाटते. पण नाना पाटील तर १९५७ साली खासदार झाले ! असो. नाना पाटील फक्त एकाच भाषेत बोलू शकतात. मराठी. हिंदी आणि इंग्लिश या दोनच भाषेत लोकसभेत कारभार चालतो. इतर भाषेत बोलायचे असल्यास ते अगोदर लिहून द्यावे लागते, आणि लिहिलेले भाषणच वाचावे लागते. नाना पाटलांना लिहिलेले भाषण वाचता येत नसे. तेव्हा असे हे नाना पाटील खासदार म्हणून निवडून गेल्यावर आकांत करणार कसा ?

थोडक्यात, शैलीच्या टोलेजंग फटकाऱ्यांनी बेजबाबदारपणे लिहिण्याची जी एक अलिकडे प्रथा पडली आहे–– आणि तिला 'माणूस' कधी कधी प्रतिष्ठितता मिळवून देत असतो— तिच्यामध्ये सत्याबद्दल, इतिहासाबद्दल कदर असावी लागत नाही. पण वस्तुनिष्ठतेची मिजास मारणाऱ्या (आणि तसा गाजावाजा झालेल्या) आपल्या साप्ताहिकाने तरी या गोष्टींकडे नीट लक्ष द्यावे असे वाटते. म्हणून हे पत्र लिहिण्याचा उपद्व्याप. छापाल अशी अपेक्षा. खात्री......?

—कुमार केतकर, ठाणे

[आणखी पत्रव्यवहार : पृ. ५३ वर]

# एक घोट पाण्यासाठी अवघ्या एक घोट पाण्यासाठी–

डॉ. बाबा आढाव.

गावाचे नाव तुपाचे बोरगाव.

सोलापूर उमरगा या राजरस्त्यावरील जळकोटपासून ३ मैलांची आडवी वाट फुटते. बोरगावची पाटी नजरेत येते.

या बोरगावात परवा इतिहास घडला. कुणाच्या मनी ना ध्यानी अगदी सहजपणी.. पाण्याच्या अवघ्या एका घोटासाठी...

अशोक लिबाजी कांबळे –१५–१६ वर्षांचे गुराखी पोरगे. दिसायला पोरगं पण कामात कुळव, औत, बैल...अगदी गड्याला मागे सारणारे. अशोकाची आई ८–९ वर्षापूर्वी साप चावून गमावली. अशोकाच्या पाठीवर चार भावंडे. बाप लिबा वेडापिसा झाला. पाच पोरांचा आईविना संसार. लिबाला दाही दिशा मोकळ्या झाल्या. दोन्हीकडच्या आज्यांनी वाटणी केली. अशोक आणि त्याची पाठची बहिण सुनंदा तुगावहून बोरगावला आजोळी आली. सुधा डिलपाला त्या आजीकडे राहिली. वर्षे निघून गेली. आणि महाताऱ्यांनी पोरांना दुनिया दावली.

आई मेली तशी आशोकाची पाटी फुटली. पहिली दुसरीतला अशोक शाळेत जाईना. त्याला गुरामागे जायला आवडू लागले. ८–९ वर्षात पोरगे चांगले ऊपसले. रानाचा वारा पिऊन.

रोज सकाळी आजा श्रीरंग जयराम गायकवाडाने कामाची वर्दी द्यावी. शेवंता आजीने भाकर पुढे ठेवावी. भाकर खाऊन दुपारची न्याहारी खिशात घालावी. गुरे सोडावीत आणि रानची वाट धरावी......अशोकाची रोजची दैनंदिनी ठरलेली. अशोकाचा एक मामा मंगळूरला शाळा मास्तर आहे. आणि दुसरा भारतीय जवान आहे. दोन चुलत मामे पुण्याला आहेत. श्रीरंगाने म्हणावं " तुम्ही कुणीबी इथं डोकं देत न्हाई. म्हाहा आसूक मातर शेतीला पुरा पडलं...काळ्या आईला आन जित्रापाला प्वार लई जीव लावतं.'... अशोकाच्या सगळ्या मामांना हे ऐकायची सवय झालेली.

शनवार–रविवारच्या सुटीला सोमवारची रजा जोडून आलेल्या मनोहर मामाकडे बघत श्रीरंग दादा असेच म्हणाला. अशोक खुषीत रानाकडे निघाला.

शेवंताआई मोठ्याने म्हणाली. असोक दुपारी वाईच लवकर ये बरं का. मामाला पुण्याला जायचं हे.' 'येतो की' म्हणत पोर वाटेला लागले.

५ फेब्रुवारी – सोमवार, दिवस हळू-हळू वर येत चालला, पाव्हण्या रावळ्यांचं आन सैपाकपाण्याचे उरकस्तवर १०–११ वाजून गेले ... तेवढ्यात शेजारचा कुणबी वरडत आला. 'ये शेवंताय. ये शेवंताय. आसोकाला वान्याच्या पोरांनी हानलं. आगं प्वार बिनसूद पडलंय...देवाच्यानं...धाव.' शेवताय अगणात आली. 'आर चांडाळा कुठाय म्हाहा आसोक...कुणी हानलं... आरं वाण्याचं काय घेतलं होतं.. आरं देवा.'

कुणब्याने गिरणीच्या दिशेने हात केला. आन सगळ्या म्हारवाड्यातला घोळका तिकडे धावला. पोर जमिनीवर पडले होते. अंग चापासल. हात हालाना का पाय हालाना... लई कालवा झाला. 'आर चडाळा आसं कसं हानलं रे? ए असोका आरं जरा बोलना... अग बया ... वाण्याच्या पोराचं काय घोडं मारलं हुतं व्हय रे'...कुणीतरी म्हटलं 'त्येला झडपन झालंय. लागीरलंय, कोन कशाला मारलं?' लिंबू – नारळ आन कोंबड्याचा उतारा झाला. पण हूं नाही की चू नाही...पोरं सांगत होती अशोकाला अमृता वाण्याच्या शरणाप्पानी मारलंय, वाण्याच्या रानात...अशोक पाणी मागत हुता त्यो म्हणी 'पाणी वाढं लई तहान लागलीया...शरण्या न्हाई देत म्हणाला. अशोक तोंडाला हाताची ओंजळ लावन बसला हुता.'

'आर वाढ'

'न्हाई...न्हाई वाढणार'

'बघ मंग बिंदगीला शिवन हा.'

'तू शिवून तर बघ'

पुढे वाकायला गेलेल्या अशोकाच्या मानेवर शरणाप्पानी गाडीच्या खीळेचा उभ्या उभ्या तडाखा दिला.'

कोंबडीने मान टाकावी तसा अशोक जागच्या जागी लुडापला. सगळी पोरं भेदरली. त्यातली काही पळत सुटली. शरणाप्पाचा भाऊ आणि चांभाराच्या पोरांनी कसाबसा अशोकाला उचलून गावात आणला.

'हा हा म्हणता गाव गोळा झाला. कुणी काय म्हणतंय. मोठी माणसे पोरांना दाबत्यात. तुम्हाला काय करायची पंचाईत, ज्याला त्याला भ्या. उगा हिसके तिच्या आयला.'

मनोहर मामांनी आणि विश्वंभर गायकवाडांनी जलदी केली. गाडी बैल जुपले. बिनसूद अशोकला गाडीत घातले. आणि नळदुर्गाची वाट धरली.

दुर्गात पोचायला एक वाजून गेला. सरकारी डॉक्टरांनी तपासले. एक इंजेक्शन दिले. पोलिसाची गाडी बोलावली आणि केस उस्मानाबादला रवाना केली. तिथवर पोचायला पाच वाजले. उस्मानाबादच्या डॉक्टरांनी मानेचे फोटो काढले आणि सांगितले, 'मानेची हाडे मोडली आहेत. मेंदूला धक्का पोचलाय. केस सीरियस आहे.' ऐकून शेवंताआय मटकन खाली बसली 'आर देवा' पण देव कुठला ऐकायला.. आणि तो जागेवर असलो तर ऐकणार...

नाकाला नळ्या आणि डोक्याला ओझं लावलं गेलं. खाटेजवळ बसलेली

शेवंताय मधून मधून अशोकाच्या कानाशी तोंड नेऊन म्हणायची 'असोक ये बाळा वाईच डोळा उघड कीरं,'

६ तारखेला पहाटेला अशोकाचा भाता थांबला. स्वत:च्या तोंडात पदराचा बोळा कोंबून शेवंताय रडू लागली. घोटभर पाण्यासाठी आशोकाचे १६ वर्षांचे जीवन संपले. पोस्टमार्टेम झाले. पोलिसांनी जाबजबाब घेतले. फाडलेला मुडदा घेऊन शेवंताय, मनोहर आणि ईश्वंभर गावी परत आले.

१६ वर्षाचा गोळा हातांनी माती आड केला. बहुतेकांनी कर्माला हात लावला. मूठभर माती टाकायला फारसे कोणी आले नाही.

६–७ तारखांना पोलिसांची ये जा झाली. १०–१२ वर्षांच्या गौतमाने पाहिलेलं जसेच्या तसे सांगितले. फौजदारांनी वाण्याच्या शरणाप्पाला अटक केली.

आज २१ फेब्रुवारी. मी उस्मानाबादच्या जिल्हा पोलीस–अधीक्षकांची कचेरी गाठली. होम इन्स्पेक्टरांनी माहिती दिली. पुन: पुन्हा ते मला पटवीत होते, 'पोरापोरांचे भांडण. एकाच वयाची गुराखी पोरे. सहज मारले...अस्पृश्यता वगैरे तसे काही नाही. प्रसंग कसा घडला याची ते नक्कल करून दाखवीत होते. पोलीसखात्याचे डोके असे चालले असावे.

३०२ कलमाखाली खटला भरला गेला आहे. अस्पृश्यता गुन्हा कायद्यातील ४ व ५ कलमे वगळली आहेत. शेवटी सर्व केस चालणार लहान मुलांच्या कोर्टात. डी. वाय. एस. पी. श्री. एम. ए. बोरकर व सब इन्स्पेक्टर पी. बी. जोशींनी चौकशी पूर्ण केली आहे. मारलेली काठी, पाण्याची बिंदगी—ताब्यात घेतली आहे. पोस्टमॉर्टेमचा रिपोर्ट आहे. हॉस्पिटलमध्ये काढलेले फोटो आहेत. एकूण इव्हिडन्सवरून पोलीस निष्कर्ष तयार आहे.

शरणाप्पा पाणी द्यायला नाही म्हणाला कारण 'स्मॉल क्वान्टीटी ऑफ वॉटर ब्रॉट फ्रॉम ए लॉंग डिसटन्स.' नकळत होऊ नये ते घडून गेले. शेवटी दोन्ही पोरे अल्लड.

आता काय करायचे ? अशोक मातीआड झाल्याने हा विचार शरणाप्पाच्या भोवती मर्यादित होत आहे.

बोरगावचे सरपच आहेत आनंदराव मुळे. शरणाप्पाचे चुलतेच म्हणाना. आनंदराव, अमृतराव ही मुळे मंडळी. लिंगायत असल्याने लोक त्यांना वाणी म्हणतात. पोलीस पाटील आहेत व्यंकटराव पाटील. धोतराचा सोगा मोकळा सोडून ते आल्यागेल्याला नाव गाव विचारतात. तहसीलदार साहेबाने त्यांना तसे सांगून ठेवले आहे असे ते सांगतात आणि याच गावातील नरेंद्र बोरगावकर तुळजापूर तालुका पंचायत समितीचे सभापती व उस्मानाबाद जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आहेत. श्रीरंगाशी बोलताना सर्वांचा आवाज अद्यापी हळुवार आहे.

७ वी इयत्तत शिकत असलेला शरणाप्पा १४ वर्षाच्या आतल्या वयाचा

म्हणून कलम ३०२ असूनही जामिनावर सुटून आला आहे. हजार पंधराशे वस्तीचे बोरगाव अगदी स्तब्ध आहे. दुष्काळामुळे ही स्तब्धता आणखी भयानक वाटत आहे म्हारवड्यातील चावडीपुढे शुकशुकाट आहे. बुद्ध भगवान, म. फुले व डॉ. आंबेडकर याचे फोटो वाऱ्याबरोबर हलताहेत. म्हातारा श्रीरंग दरवाजात बसून आहे. शेवता-माय आणि तिची नात घरात काही-तरी खुडबुडताहेत.

जे ते आपल्या कामधंद्याला गेलेले आहेत. दावणीतील गुरे अशोक गेल्या-पासून बांधूनच आहेत.

या शांततेचा आमच्या गाडीच्या आवाजाने भंग होतो आणि शंकेचा, संशयाचा धुरोळा उधळल्यागत होते.

काय सांगावं बाबा.

आई मेली तशी वाढवली.

कुणाच्या अध्यात नव्हती, मध्यात नव्हती.

गुराढोरांत रहावा आन गुराढोरा-सारखा राबावा. पाणी मागीतले म्हून लई गुन्हा झाला व्हयी ?

हीर लई लांब न्हवती.

पर वाण्याची मुभा नव्हती.

गावातल्या काहीजणाला शिवल्याल चालतं. काहीजणाला चालत न्हाई.

अशोकाला वाटलं हापशांवर चालते. बिंदगीलाही हात लावला म्हून काय व्हईल. काय झाले ते बघायला अशोक जाग्यावर न्हाई......

आरे देवा...घोटभर पाण्यासाठी प्वार नेलेस...घोटभर पाण्यासाठी.

घडलेली घटना अगदी स्पष्ट आहे. आणखीही अशा घटना घडतील. परंतु या देशातील बथ्थड समाजमन अजूनही इतके बधीर बनू शकते ?

शरणाप्पाचे सगेसोयरे त्याला सोड-वायची खटपट करतील. सत्यालाही अनेक रंग व फाटे फुटतील. शासन आपली अब्रू सांभाळण्याची पराकाष्ठा करील. समाजमनातील चार दिवसांची हळहळ संपून जाईल...शरणाप्पा लहान आहे. अगदी वस्तुस्थिती आहे. परंतु त्याचे मन याच समाजव्यवस्थेने घडवले आहेना ? या समाजव्यवस्थेला कोणते शासन घडणार आहे ? आणि ते शासन कोण घेणार आहे ?

का आमची मने आणखी निर्ढावणार आहेत ? तेच ते पहायला सोकावणार आहेत ?

पुण्याच्या मानकुंवर सहगल या शीख समाजातील डॉक्टर तरुणीच्या खून प्रकरणातील निकाल मी आठवतो आहे. ' मानकुंवरचा खून घडला ही घटना सत्य आहे. परंतु कोणी केला ?'......

न्यायदेवता आंधळी आहे. समोरच्या माणसांच्या पलीकडे समाजात जाण्याची तिला मुभा नाही. डोके सुन्न होते आहे. तुळजापूरहून गाडी पुढे चालली आहे. या अंबाभवानीच्या कपाळाला बक-ऱ्याच्या ताज्या रक्ताचा टिळा लावतात. कारण हे देवस्थान जागृत आहे म्हण-तात. कारण ते मुके आहे.

अशोकबाळा तुझ्या रक्ताचा टिळा या देशातील लोकशाहीच्या कपाळावर लावून तिला मुके बनविण्याचा तर संकल्प नाही ना ?

काय ? सत्य कोठे आहे ? सारा समाज झोपलेला आहे हे खरे सत्य आहे.

● ● ●

प्रथम श्रीरामपूर
मग बेलवंडी
आणि आता –

# मुक्काम दहिवडी

मुकुंद मणूरकर

'कोणत्याही जनसमूहांना त्यांची तशी इच्छा असेल व त्यांच्याजवळ सामर्थ्य असेल तर उठाव करण्याचा व अस्तित्वात असलेले शासन उगारून देण्याचा व त्यांना जास्त चांगल्या तऱ्हेने परवडेल असे नवीन शासन करण्याचा हक्क आहे. हा हक्क अत्यंत महत्त्वाचा व अत्यंत पवित्र आहे. एवढेच नव्हे तर अशा जनतेच्या कोणत्याही बहुसंख्य विभागाला अल्पसंख्य विभागाला दडपून टाकून क्रांती करता येईल व जुन्या कल्पनांप्रमाणे व जुन्या कायद्यांप्रमाणे जाता न येणे हेच क्रांतीचे वैशिष्टच आहे.'

अब्राहम लिंकनचे हे शब्द व कॉ. दत्ता देशमुख यांच्या भाषणाचा शेवट.

'निवडणुकीतून सत्ता हाती येत नाही. खरी सत्ता वेगळीच असते आणि ती म्हणजे आर्थिक. केरळमध्ये नंबुद्रिपादनी निवडणुकीतून सत्ता मिळविली. पण त्यांना राज्याचा डोलारा सावरण्यासाठी अखेर बिर्लांच्या दाढीला हात लावावा लागला. पैसा बँकेत असतो. म्हणून बँकेला घेराव घालणे.'– इति कॉ. यशवंत चव्हाण.

'रडगाणी गाऊन काही मिळत नाही. हट्टाग्रह धरला पाहिजे. हातात शस्त्र धरले पाहिजे. आमच्यापाशी गमवायला काही शिल्लकच नाही. म्हणून मरायला हरकत नाही. महाराजांनी सुरत लुटली. नाना पाटलांनी खजिने लुटले, प्रतिसरकार स्थापन केले. मग तुम्हाला का हे शक्य नाही?'–लातूरचा एक कार्यकर्ता.

महाराष्ट्रात सुमारे पन्नास लाख भूमिहीन शेतमजूर आहेत. त्यांचे कुटुंबीय मिळून ही संख्या अडीच कोटींच्या घरात जाते. यात थोडीशीच जमीन असलेले गरीब शेतकरी व त्यांचे कुटुंबीय मिळविले की महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या साठ-सत्तर टक्के लोकसंख्या होते. या प्रचंड वर्गघटकात वरील

विचारांची ठिणगी पडलेली आहे.

जाळ व्हायला विशेष वेळ लागणार नाही !

◻

प्रथम श्रीरामपूर, मग बेलवंडी.

आणि आता–दहिवडी, तालुका माण, जिल्हा सातारा. महाराष्ट्र राज्य भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी परिषदेचे तिसरे अधिवेशन १७ व १८ फेब्रुवारी १९७२ रोजी भरलेले. दुष्काळाच्या भीषण परिस्थितीची पार्श्वभूमी व रंगमंच तर प्रत्यक्ष दुष्काळाचा प्रातिनिधिक भाग. बारा महिने अठरा काळ दुष्काळाचा सुकाळ असलेला हा दहिवडीचा परिसर. परिषदेत प्रवेश करताना वाटत होते की, अंतर्बाह्य परिस्थितीचे दर्शन घडणार. पण बाहेरून बरेच काही व्यवस्थित दिसले. लोकांचे कपडे वगैरे ठिकठाक होते म्हणजे टेरिलीनवाल्या मंडळींना वावरताना अवघडल्यासारखे वाटू नये इतपत. पोटाची खळी, थोडीशी का होईना, पण भरण्याएवढा पुरेसा मसाला होता आणि याचे कारण काय तर दुष्काळ ! क्रूर विनोदाचा प्रकार म्हणा हवे तर, पण वस्तुस्थिती आहे. दुष्काळामुळे या लोकांना रोज काम मिळते. रोज पैसा मिळतो. नाहीतर इतर वेळी यांना वर्षाचा फक्त तिसरा हिस्साच काम मिळते. उरलेल्या दिवसात पोटाच्या बरगड्या दाखवत हिंडावे लागते. दुष्काळाचा आणखी एक फायदा झाला, अर्थात परिषदेच्या दृष्टिकोनातून. दुष्काळाच्या तडाख्यामुळे मध्यम स्थितीतील शेतकऱ्यांनाही आपल्या जमिनी सोडून दुष्काळी कामांवर धावावे लागले. यांच्यातील काही भाग आज परिषदेत सामील झाला आहे. 'एकदा का हे लोक आमच्यात आले की आमचे कार्य, तळमळ पाहून, पुढे परिस्थिती बदलल्यावरही ते आमच्यातून बाहेर पडणार नाहीत' असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

परिषदेची स्थापना १९७० साली श्रीरामपूर येथील अधिवेशनात झाली. महाराष्ट्रातील एक मोठी शक्ती संघटित करण्याचा हा पहिला प्रयत्न. पुढे महिनाभरातच अधिवेशनातील ठरावांची जनतेला व सरकारला माहिती देण्यासाठी मुंबईत सुमारे ३० हजार शेतमजूर, वारली, आदिवासी, अस्पृश्य, नवबौद्ध आदींनी एक विराट मोर्चा काढून आपले सामर्थ्य दाखविले. या पुढची पायरी म्हणजे संयुक्त निदर्शने. प्रथम जिल्ह्याच्या ठिकाणी व नंतर १ मे १९७१ रोजी १२० तालुक्यांच्या ठिकाणी एकाच वेळी निदर्शने करण्यात आली. दूरदूरच्या ठिकाणी विखुरलेल्या लोकांनी एकाच वेळी निदर्शने करणे हा एक चमत्कार होता. नंतर बेलवंडी येथे परिषदेचे दुसरे अधिवेशन झाले. कमाल जमीन धारणा मर्यादेचा प्रश्न यावेळी गाजत होता. या अधिवेशनात श्रीरामपूरच्या ठरावांचीच पुनरुक्ती करण्यात आली. नंतर बांगला देशचे युद्ध झाले.

पृष्ठ ५० वर

खास वार्तापत्र

# ना. भाऊसाहेब वर्तकांच्या मतदारसंघातील कुणी एक हरुण पाटील आणि शेठ महमद अल्ली

प्रभाकर म्हात्रे

वसई तालुका पुरवठा मंत्र्यांचा मतदार संघ आहे. आता येथे माणशी पाव किलो तांदूळ न् पाव किलो गहू मिळतो फक्त आठवड्याला. मामलेदाराला लोक विचारावयाला जातात, 'अर्ध्या किलो धान्यात आठवडा एका माणसाने काढावयाचा कसा?' मामलेदार सांगतात, 'धान्य कमी आहे;कसे तरी भागवून घ्या.'

ठाणे जिल्ह्याचे कलेक्टर रंगनाथन एक अगदीच आगळा माणूस आहे. वर्ष झाले या गृहस्थाला ठाण्याला येऊन. पण कोणाच्या अध्यात नाही मध्यात. सरकारचे धोरण आणि कायदा यांवर ठाम बसून आहे हा गृहस्थ. साहजिकच वशिलेबहाद्दर नेते, पुढारी, श्रेष्ठी वगैरे गोतावळ्याची फार पंचायत झाली आहे या जिल्ह्यात.

मुंबईच्या तोंडावरचा हा जिल्हा त्यामुळे या प्रवेशद्वारात काळाबाजारवाल्यांचा धुडगूस फार चालावयाचा; पण रंगनाथनने यावर्षी नाक्यानाक्यावर चौक्या बसवून काळाबाजारवाल्यांची बरीच नाकेबंदी केली आहे. गृहस्थ वस्ताद एवढा की या माणसाला काळ्या बाजारासाठी वापरात येणारी लॉरी समजली, की सरळ R. T. O. ला सूचना जाते. महाराष्ट्राच्या शासनाला असले ८।१० करडे ऑफिसर्स जरी मिळाले तरी लोकांच्या पन्नास टक्के यातना कमी होतील; पण वस्तुस्थिती अशी सांगते, की असले ऑफिसर्स जनसंपर्कापासून दूर कुठल्या तरी प्रोजेक्टमध्ये बसविले जातात. आतापर्यंतची तरी तसे सांगते.

रंगनाथन् एवढे खमके पण त्यांनाही पुरवठा मंत्र्यांच्या मतदारसंघात, वसई तालुक्यात, खुद्द तहसीलदार कचेरीपुढे हार खावी लागते. या वर्षीच्या हगामापासूनच, म्हणजे कार्तिक महिन्यापासूनच भाताच्या चोरट्या व्यापाऱ्यांनी आपला मोर्चा वसई तालुक्याकडे वळविला. वाहतुकीचे सर्व लक्ष वसईत केंद्रीत केले आहे. इतर ११ तालुक्यात जिल्हा-कलेक्टर रंगनाथन्साहेबांची फळी मजबूत आहे; पण वसईत त्यांचे तहसीलदारच त्यांना साथ द्यावयास तयार नाहीत.

काही दिवसांपूर्वी तलाठी सुदाम पाटील आणि ठाकूर G. P. I. (Grain Purches Inspector) यांनी चोरटे भात घेऊन येणारी लॉरी पकडण्यासाठी सापळा टाकला. लॉरीवाला घाबरला. मोकळ्या माळरानात भात टाकून लॉरी घेऊन तो पळाला. दोघाही कर्मचाऱ्यांनी भात बेवारशी म्हणून जप्त केले. पण चोरटे व्यापारी तडक मामलेदार पांडूरग घरत यांना भेटले. २४ तासांनतर आदल्या दिवशीची तारीख टाकून बेवारशी भात दोघा शेतकऱ्यांच्या नावे लेव्हीसाठी जमा करण्यात आले आणि ते पैसे चोरट्या व्यापाऱ्याला मोजून देण्यात आले. G. P. I. ठाकूर आणि तलाठी सुदाम पाटील या दोघांचीही चोरट्यांनी जाहीरपणे जिरवली. हा तलाठी नतर गेला एक दिवस सारावसूलीसाठी ससुनवघरला. ससुनवघर म्हणजे वसई तालुक्यातील, मुंबईच्या तोंडावरचा गाव. हायवे या गावातूनच जातो. ठाणे जिल्ह्यातील हातभट्टीचे हे सर्वात मोठे केंद्र. ४१५ लॉरी माल वांद्रा ते बोरीवलीपर्यंतच्या हातभट्टी केंद्रांना पुरविला जातो. या गावात तलाठी पाय ठवताच एक भूकेकंगाल वारल्याच्या घरात दीडदोनशे पोती भात दिसले. त्याने त्या वारल्याला भात कुणाचे म्हणून हटकले. बिचारा वारली ही जात सहसा कधी खोटे बोलत नाही त्याने सांगितले 'वसईच्या एका शेटजीचे हे भात आहे' एवढ्यात तेथे सरपंच आला. त्याने काही विचारपूस करण्यापूर्वीच तलाठ्याला शपटायला सुरुवात केली. आजूबाजूला फॉरेस्टगार्डस् होते. त्यांनी मार खाणाऱ्या तलाठ्याला कसेबसे घरी पोचविले. तलाठ्याने लेखी तक्रार मामलेदार वसई यांना दिली. आज त्याला महिना लोटला; पण मामलेदारने जागेवर जाऊन साधी चौकशीही केली नाही.

भिवंडी तालुक्याचे भिवंडी-तहसीलदार श्री. उमाकांत झांबरे यांनी नाकेबदी केली असल्यामुळे पाये, थायगाव, टेंबवली, खारबाव येथल्या चोरट्या व्यापाऱ्यांची मोठी पंचाईत झाली आहे. त्यांनी गेल्या महिन्यापासून वसईला नागले, पोमणमार्गे बैलगाडीने माल आणण्यास सुरुवात केली आहे. रोज रात्री ३०-३५ बैलगाड्यांचा तांडा निघतो या तांड्याचा नायक आहे हरुण पाटील, २५ वर्षांचा तरुण. बाप आहे पोलीस-पाटील. बापाने ३० एकर जमीन वारल्याची गडप केली आहे. स्वतःची १५-२० एकर आहे. पण नवल

असे की, बापाने एवढी जमीन असूनही या तालुक्यात अस्तित्वात नसणाऱ्या आपल्या काल्पनिक भाच्याच्या नावे सरकारकडून चक्क १० एकर जमीन उपटली आहे. आज या घटकेलाही जर कुणी महसूल सचिवांना विचारले, 'अहो, श्रीमंत पाटलांच्या काल्पनिक भाच्याला ही सरकारी जमीन मिळाली कशी ?' तर महसूल खात्याच्या सचिवां-कडे त्याला उत्तर नाही. फार तर ते एवढे म्हणतील, 'मंत्र्यांच्या मतदार संघातली बाब आहे ती.' या नागले गावात ९५ टक्के वस्ती वारल्यांची आहे तर ५ टक्के जमीन वारल्यांकडे आहे. ९० टक्के वारली भूमिहीन आहेत. त्यापैकी बहुतेक सर्वजण अर्धा-पाऊण एकर सरकारी जमिनी लावतात म्हणून दरवर्षी न्यायालयाकडून शिक्षा-पात्र ठरत आहेत. त्यांनी या जमिनी-साठी अर्ज केले होते; पण ते अर्ज फाईल होऊन पाटलाच्या काल्पनिक भाच्याला १० एकर जमीन बहाल करण्यात आली.

आता या २५–३० बैलगाड्यांच्या तांड्याचे कथानक ऐका. या तांड्याच्या वाटेवर साष्टीकरपाडा म्हणून एक आदिवासी आणि उपासी पाडा लागतो. तिथे तुकाराम पाटील म्हणून एक म्हातारा राहतो. तो म्हणाला, '३५–४० वर्षांपूर्वी आजच्यासारखा लॉऱ्यांचा वापर नव्हता. तेव्हा घाटमाथ्यावरून कोकणात बैलगाड्यांचा तांडा निघत असे. तो तांडा रात्रीच्या शांत वेळी चालू लागला, की अंथरुणात ऐक-णाऱ्यांना एक आगळेच संगीत ऐकायला मिळे.' आता त्या बैलगाड्याही नाहीत आणि तो रस्ताही नाही. हरुण पाटलाने पस्तीस वर्षांनंतर बैलगाड्यांच्या तांड्याचे संगीत ऐकविले; पण गाडीतले भात सणावारासाठी चार पायली घेईन म्हटले तर हरुणचा भाव भलताच मोठा. ७५ रुपये मण म्हणजे २२५ रुपये क्विंटल भाताचा भाव सांगतो. सरकारी भाव आहे ७६ रुपये क्विंटल.

असा हा हरुण पाटलाचा तांडा रोज रात्री या ७।८ उपाशी गावावरून जात असतो. उपाशी वारल्यांनी फक्त त्या गाड्या पाहून नजरेची भूक भागवून घेण्यात समाधान मानावे यापलीकडे काही नाही.

उन्मत्त झालेल्या चोरट्या व्यापाऱ्यांना वेळकाळ पहाण्याचे भान नसते. गेल्या आठवड्यात रात्री ८ वाजता हरुण पाटलाचा तांडा कामण गावावरून जाऊ लागला. तिथल्या काही मजुरांना या गोष्टीची चीड आली. मामलेदार आठ-वड्याला माणसाला पाव किलो तांदूळ देतो आणि हरुण पाटलाच्या ३० भात-गाड्या आमच्या पोटावरून रोज जातात हा काय तमाशा आहे ? त्यांनी गाड्या अडविल्या. काही गाड्या पळाल्या. तलाठ्याला बोलावून आणले. पंचनामा लिहिला. तलाठ्याने भात जप्त करून मामलेदारला रिपोर्ट केला. रिपोर्टमधली महत्त्वाची गोम ही– 'सदर भात वारल्याने लेव्ही दिलेली नाही व स्टॉक डिक्लेअर केलेला नाही.'

या दोन्ही गोष्टी सदर भात जप्त

करून सरकारजमा करण्यास पुरेशा आहेत. शिवाय भातवाल्यावर न्याया-लयीन कारवाईही सुरू करता येते.

पण पुरवठा मंत्र्यांच्या तालुक्यात असे घडेल तर पाव किलोवर लोक उपाशी का तडफडतील ?

तलाठ्याने गाड्या अडविल्याचे समजताच हरुणचा बाप थेट भात खरीदणाऱ्या शेटजीकडे गेला. शेटजींनी २–३ फटफट्या गाड्यांवरून २–३ दादा कामणला रवाना केले व मामलेदाराला फोन केला. वसई ते कामण सरळ १६ मैलांचे अंतर आहे. बहुतेक रस्ता घुरळयाचा आणि खाचखळग्याच्या आहे.

इकडे दादांनी येऊन तलाठ्याला यथोचित दम दिला, 'गाड्या का अडविल्यास, सोडतोस की नाही ? नपेक्षा तुझ्या बापाकडून, – मामलेदारकडून परवाना आणतो बघ आता.'

आणि अवघ्या २०–२५ मिनिटांच्या अवधीत तलाठी खोटा ठरला. पंच मूर्ख ठरले. हरुण आणि हरुणचे साथीदार, वसईचे दादा खरे ठरले. दुपारी कचेरी सुरू होण्यापूर्वीच, कागदपत्र पाहण्या-पूर्वीच मामलेदाराने हरुणच्या गाड्या भातासह मोकळ्या केल्या. आता बोला, वसई तालुक्यात राज्य कुणाचे आहे ? महाराष्ट्र शासनाचे की चोरट्या व्यापाऱ्यांचे ? हरुण पाटलाने वाकुल्या दाखवीत तलाठ्याला सुनविले, 'अजून १२५ लॉरी माल म्हणजे १२५० बैल-गाड्या भात शिल्लक आहे. तू शहाण-पणा करू नकोस. तुझी आता बदली करून टाकू.'

हा दुसरा चोरट्या व्यापाऱ्यांचा नायक महमद अल्ली याला इकडे महा-राष्ट्राचा भावी मस्तान, तालीब म्हणून ओळखले जाते. भाताचा चोरटा व्यापार, सोन्याच्या घड्याळांची डबोईवरून आयात, मोटारी किंवा मोटारींचे चोर-लेले पार्टस्, घरफोडीतील वस्तूंची खरेदी, एवढेच काय पण युनिसेफकडून देणगी मिळालेले अन्न व भांडी यांचीही चोरट्यामार्फत खरेदीविक्री असा नानाविध प्रकारचा धंदा महमद अल्ली शांत चित्ताने गेली ६–७ वर्षांपासून करीत आहे रघुनाथ आणि काशिनाथ हे याचे दोन घरगडी आहेत. चोरट्या तांदळाची हजारो रुपयांची उलाढाल हे दोन घरगडी पहातात.

६ वर्षांपूर्वी सुके मासे विकणारा महमद अल्ली आज 'शेट' कसा झाला ? कुठच्याही मंत्र्यांच्या मतदारसंघात असे चमत्कार नवीन नाहीत. निर्मळचा एक साधु ८ वर्षांपूर्वी कफल्लक म्हणून भटकत होता. आज त्याची प्रॉपर्टी म्हणे १॥ कोटीची झाली आहे काहीही स्थावर वा जंगम प्रॉपर्टी न दाखविता त्याने स्थापलेला ट्रस्ट चॅरिटी कमिश-नरनी नोंदवून घेतला आहे. ट्रस्टी कोण आहेत ? माजी मंत्री भानशंकर याज्ञिक, सत्तनबोस, पुरवठा मंत्र्यांचे विश्वासू शासकीय अधिकारी श्री. जी. आर. तावडे वगैरे. जुन्याकाळी नशीब फळ-फळण्यासाठी राजाश्रय लागत असे आता मंत्राश्रय. आणि भरीला कुवेत दुबईचे मचवेवाले अरब भेटले की नशीब धाडकन उदयाला येते. तेव्हा महमद

अल्लीचे, महाराष्ट्राच्या भावी मस्तान शेटचे राहिले. हे भावी मस्तानजी ६ वर्षांपूर्वी इकडे अवतरले तेव्हा त्यांनी सरपंचाला दुवा देवून, एका वारल्याची जमीन बळकावली आणि वारल्याला चक्क हाकलून लावले. त्या वारल्याची दु:खद कहाणी कलेक्टर महाजनना कळविण्यात आली. त्यांनी चौकशी केली. वारल्यावर झालेला अन्याय सिद्ध झाला. त्या वारल्याला ती जागा देण्याचे शासनाने निश्चित केले. महमद अल्लीला जागा खाली करणेची नोटीसही कलेक्टरांनी दिली पण मस्तानशेट बनण्यासाठी आलेला महमदअल्ली असे किती कलेक्टर आले गेले तरी भीक थोडीच घालणार? त्या नोटिशीनंतर ठाण्याला मोजून अर्धा डझन कलेक्टर आले आणि गेले पण महमद अल्लीने एकाही कलेक्टरला भीक घातली नाही. नोटिशीची अंमलबजावणी करणारे त्यावेळचे मामलेदार यशवंतराव साळवी आता त्याच भागाचे डेप्युटी कलेक्टर आहेत; पण साऱ्यांच्या मर्यादा महमद अल्लीने ओळखल्यात आणि व्यापलेल्या जागेच्या परिघाचीही मर्यादा आता त्याने चौपट केली आहे.

येथे उपासमार कुठच्या शिगेला पोचली आहे. याची थोडीशी कल्पना यावी म्हणून सांगतो. मुंबईच्या टेस्टमॅचच्या पहिल्याच दिवशी म्हणजे मंगळवारी वसईचे फौजदार चंद्रकांत साळवी म्युनिसिपालिटीच्या टेलिव्हिजनवर बंदोबस्तात होते एवढ्यात ससुनवघर पुलावरून म्हणजे २० मैलावरून एक हवालदार धापा टाकीत, पोलीसस्टेशनवर आला. 'एक प्रेत पुलाजवळ पडले आहे.' फौजदार चंद्रकांत साळवी कामात तेवढेच दक्ष, त्यांनी ताबडतोब ज्युरीसाठी पोलीस पाठविले. दुसऱ्या दिवशी साळवींना एका पत्रकाराने विचारले, कालचा प्रकार घातपात, खून असा होता का? फौजदार उत्तरले, 'नाही हो, तसे काही नाही.' पुढे पत्रकाराचा खोचक प्रश्न—'मग तो भूकबळी असेल.' फौजदार क्षणभर गप्प. पण लगेच आपण पोलिस-ऑफिसर आहोत याची जाण येताच, 'नाही नाही हो

---


**माणूस**

यापुढील अंक

**दूध विशेषांक**

किंमत पन्नास पैसे


---

भूकबळी वगैरे तसे काही नाही हा.' भूकेने माणसे मरताना 'मी भूकेने मरत आहे.' असे मागे लिहून ठेवण्याची प्रथा वा कायदा नसल्यामुळे पडलेला भूकबळी अपचनानेच मेला असे सांगण्याची शासनाकडे सोय झाली आहे.

आज २२५ रुपये क्विंटलने विकले जाणारे भात एप्रिलपर्यंत ३०० रुपये क्विंटलपर्यंत जाईल असा कयास पायगाव-मालोडीच्या सावकारांचा असल्यामुळे त्यांचे हजारो क्विंटल भात भारीभावासाठी तसेच पडून आहे.

जिल्हा पातळीवरील महसूल विभागाचा एक पुरवठा अधिकारी आणि पोलिसखात्यातील राज्यपातळीवरचा पुरवठा विभागाकडील पोलिस-अधिकारी यांच्या समवेत बोलतानाचा प्रसंग–

'काय साहेब ××× भय्याच्या लॉऱ्या दिवसा ढवळ्या तांदूळ घेऊन जातात मग तुमचे तहसिलदार, फौजदार करतात काय?'

'म्हात्रे, तुमचे तरुण रक्त आहे. तुम्हाला व्यवहार कळत नाही.'

'व्यवहार करा पण निदान दिवसाढवळ्या नको' मी.

'तसे आमचे अधिकारी एकदम सोवळे आहेत असे आम्ही म्हणत नाही; पण तुम्ही लोक एकतर्फी आम्हाला झोडपता ते योग्य नाही. अहो शेवटी आमच्या लोकांच्या जीविताची शाश्वती काय?......'

'××× भय्या लॉरीतून तांदूळ नेताना सोबत सुरे, पिस्तुल रायफलसह ७–८ भय्याची तुकडी लॉरीत असते माहीत आहे ना?

'होय, तसे ऐकायला येते'–मी.

'ऐकायला येते नव्हे ते खरे आहे. एखादा मामलेदार किंवा फोजदार या चोरट्यांच्या माराला बळी पडणारच नाही असे नाही. म्हणून त्यांनाही विचार करावा लागतो.'

'मग सरकार अशा नरपशूंचा बंदोबस्त का करीत नाही?' मी.

'अहो सरकार तुमचेच आहे, तुम्ही तुमच्या प्रतिनिधीला सांगा की.'

पुढचा संवाद येथे न लिहिलेले बरा.

पण चांगली चांगली माणसेदेखील सांगतात की 'वसईत भाताचा-तांदूळाचा काळाबाजार करणाऱ्या एक भय्यांच्या दुकलीने गेल्या ५।६ वर्षात पद्धतशीरपणे २३।२४ माणसांचे बळी घेतले आहेत. या दुकलीला जो आड जाईल तो कोणीही असो, सायंकाळी सुखरुप घरी जाण्याऐवजी त्याला सरळ सरणावर न्यावे लागते.'

वसई तहशीलात काळचा बाजारवाल्यांसाठी एक खास सोय आहे. मामलेदार एक कायमस्वरुपाचे परमिट काळ्या बाजारवाल्याना देतो. हे परमिट घरगुती वापरासाठी मीलवरून भात भरडून आणण्यासाठी असते. पण त्या ८।१० क्विंटल भात परमिटावर चोरटे व्यापारी ८।१० शे लॉऱ्या भात काळया बाजारासाठी नेत असतात.

● ● ●

# आलेपाक

■ बलराज मधोक म्हणतात: जनसंघात वाजपेयींच्या व्यक्तिमत्वाची विभूतीपूजा सुरू आहे.

मधोकांचे म्हणणे खरे असावे. कारण आम्ही एका पत्रकाराने केलेली 'जय जय अटलबिहारी' अशी आरती ऐकलेली आहे.

■ हिंदुस्थान एअरॉनॉटिक्सने बांधलेले पहिले मिग – २१ एम विमान नुकतेच समारंभपूर्वक भारतीय हवाई दलाच्या स्वाधीन करण्यात आले. वस्तुतः हे विमान १९७३-७४ मध्ये हवाई दलाच्या हवाली करण्याचे ठरले होते. पण ठरलेल्या वेळेच्या कित्येक महिने आधी ते बांधून तयार झाले.

कारण ते बांधायची योजना हवेत केलेली नव्हती.

■ बडोदे येथील सहविचारिणी सभेच्या ८३ व्या वार्षिक संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात प्रा. रा. शं. वाळिंबे म्हणाले: साहित्यक्षेत्रातही सौंदर्याला फार महत्व आहे.

म्हणजे लेखिकांच्या, संपादिकांच्या आणि वाचिकांच्या सौंदर्याला ना ?

■ बाळ ठाकरे एका व्याख्यानात म्हणाले: मुख्यमंत्री नाईक ६० व्या वर्षी निवृत्त होणार आहेत.

पण आम्हाला तर वाटते की नट्यांसारखे नाईकांचे वयदेखील कधी वाढणारच नाही; मग निवृत्तीचा प्रश्न येतोच कोठे ?

■ एक काँग्रेस कार्यकर्ते म्हणतात: शहाण्या माणसाने राजकारणात शिरू नये.

दुसरे एक काँग्रेस कार्यकर्ते म्हणतात: राजकारणातून बाहेर पडणाऱ्या माणसाला वेडाच म्हटले पाहिजे.

■ शाहीर साबळेंच्या फिरत्या नाट्यगृहाच्या उद्घाटनाच्या वेळी भाषण करताना रामानंद सागर म्हणाले: या देशामध्ये जितके महत्त्व राजकारणाला आहे तितकेच किंबहुना त्यापेक्षा जास्त महत्त्व कलेला आहे.

राजकारण आणि कला यांच्यात असा फरक करणे आम्हाला पटत नाही. कारण राजकारण ही एक कलाच आहे.

■ पालघर पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन करताना महाराष्ट्राचे पुरवठामंत्री भाऊसाहेब वर्तक म्हणाले: गरीबीची कळकळ बाळगणारा जगात भारत हा एकच देश आहे.

गरीबी बाळगणारासुद्धा हा एकच देश असावा.

■ पुणे सार्वजनिक सभेने केलेल्या एका ठरावात म्हटले आहे: 'या' तमाशेवजा

नाटकात पेशवाई, ब्राह्मण, नाना फडणीस आणि पुणे शहर यांची विकृत स्वरूपात निंदानालस्ती केलेली आहे.

पेशवाई, ब्राह्मण, नाना फडणीस आणि पुणे शहर या चारांची निंदानालस्ती एकाच नाटकात करणे शक्य आहे असे मानून पुणे सार्वजनिक सभेनेच त्या चारांचा घोर अपमान केला आहे.


■ दि महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनच्या चौदाव्या वार्षिक सभेत, एकाधिकार कापूस खरेदी योजनेबद्दल सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांचा गौरव करताना मुख्यमंत्री वसंतराव नाईक म्हणाले : खरे म्हणजे एकमेकांची तारीफ करण्याची आमची प्रथा नाही.

म्हणजे खाजगीत हो.

■ भारतीय जनसंघ सध्या सोंग्रीसाधूंना आणि मधोकेबाजांना बाजूला सारायचा प्रयत्न करत आहे. ●

## एक नवी संघटना

विशाल मानवी कळपातील समानशील व्यक्तींनी एकत्र येऊन आपली संघटना उभारण्याचा प्रकार सर्वकाळी आणि सर्वत्र घडत असतो. विशाल मानवा कळप आणि त्याच्या कक्षेतील छोटया छोटया संघटना यांच्या परस्परसंबंधातून त्यांची स्वरूपे आकार घेत असतात. हे ध्यानात घेऊनच स्वीडनमध्ये निर्माण झालेल्या एका नव्या संघटनेकडे पाहिले पाहिजे.

ही संघटना आहे गेश्या-गणिकांची. संस्थेला सुरू होतानाच १०७ सभासद लाभल्या आहेत. नुकत्याच झालेल्या त्यांच्या पहिल्या अधिकृत सभेत स्वतःचे बातमीपत्र काढण्याचे संघटनेने निश्चित केले आहे. या बातमीपत्रात गेश्या-गणिका गिन्हाईकांच्या आपण करू शकणाऱ्या सेवेच्या जाहिराती देऊ शकतील. संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांची नावे मात्र अजून जाहीर झालेली नाहीत. त्याऐवजी एवढीच मोघम माहिती प्रसृत करण्यात आली आहे की क्रमांक ७६६ अध्यक्ष, क्रमांक ४२ उपाध्यक्ष आणि क्रमांक १६ कार्यवाह म्हणून निवडून आल्या आहेत.

माझ्यासारख्या आंबटषोकी मराठी माणसाच्या मनात विचार येतो: वर उल्लेखलेल्या बातमीपत्रातील 'वाचकांचा पत्रव्यवहार' हे सदर वाचायला मिळाले तर मज्जा येईल! ●

## भारतियांची महत्त्वाकांक्षा

नादिष्ट माणसे मला फार आवडतात. आजूबाजूच्या कंटाळवाण्या व्यवहारात तो आपल्या वेगळेपणामुळे अंमळ जी गंमत आणतात तिचे मला मोठे आकर्षण आहे. चारचौघांसारखा वाग, ही वडिलांची आज्ञा शिरसावंद्य मानून आम्ही चारचौघांसारखे झालो. माझ्या आजूबाजूचे चारचौघेही इतर चारचौघांसारखेच आहेत. किंबहुना चारचौघांसारखे असणे ही तुमची-माझी महत्त्वाकांक्षा असते; त्यामुळेच स्वतः-सारखे असणे ही महत्त्वाकांक्षा कोठे दिसली की ती लक्ष वेधून घेते.

इंग्लंडमध्ये नुकतीच मोठ्यात मोठ्याने ओरडण्याची स्पर्धा झाली. इंग्लंड जर्मन, फ्रान्स आणि अमेरिका या चार राष्ट्रांच्या ओरडयांनी वा बोंबल्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. सगळ्या बोली भाषांना पटणारा 'सू-ईड' असा ध्वनी जास्तीत जास्त मोठ्याने करणे, असे या स्पर्धेचे स्वरूप होते. केनेथ लीडर या ईशान्य इंग्लंड-मधील ४२ वर्षांच्या एका कोळ्याने ही स्पर्धा जिंकली. स्त्रियांसाठी असलेल्या स्पर्धेत मार्गारिट फेदरस्टोन नावाची बाई विजयी ठरली.

ओरडण्याचे विशेष अप्रूप भारतीयांना वाटणार नाही. कारण ओरडणे हा भारतीयांचा खास राष्ट्रीय स्वभाव-विशेष आहे. त्यामुळे मोठ्याने ओरड-ण्याच्या स्पर्धेत भारतीयांच्या शंखध्वनी-पुढे इतर कोणत्याही राष्ट्राचा टिकाव लागण्याची सुतराम शक्यता नाही. पण त्यासाठी या गुणाची कसोटी पाहणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरण्याचा, त्यांसाठी पद्धतशीर सराव करण्याचा नादिष्टपणा आपल्याला झेपेल काय? मला तर वाटते आपल्यापाशी नादिष्ट-पणा नाही म्हणून आपण जगात मागे पडतो. खरे तर आपल्यापैकी बहुतेकजण नादिष्टपणाबद्दल नफरत बाळगतात. चारचौघांसारखे असणे हीच भारतीयांची एकमेव महत्त्वाकांक्षा असते.

## भीमकोंबडा आणि 'वेर्डोमानव'

विज्ञानकथातून कल्पिलेले भविष्य-कालीन जीवन मोठे विलक्षण असते. त्यात महामानवाची कल्पना पुन्हा पुन: केलेली दिसते. कथाकल्पना वास्तवात आल्याची उदाहरणे पुष्कळ आहेत. त्यामुळे महामानवाची शक्यता लक्षात घ्यावी लागते. पुढ दिलेली माहिती या अनुरोधाने वाचली म्हणजे तिचे महत्त्व वेगळे सांगायची गरज भासणार नाही.

अमेरिकेत कॅलिफोर्नियातील एका कुक्कुटपालकाने १० किलोग्रॅम वजनाचा भीमकोंबडा निर्माण केला आहे. सर्व-सामान्य कोंबड्यापेक्षा दुप्पट वजनाच्या या कोंबड्याचे नाव 'वेर्डो' असे ठेवण्यात आले आहे. वजनाप्रमाणे वेर्डो चांगलाच ताकदवान आहे आत्तापर्यंत त्याने दोन मांजरांना ठार केले असून एका कुत्र्याची तंगडी मोडून ठेवली आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की वेर्डोची पिलेही त्याच्यासारखी भक्कम आहेत.

भीमकोंबडा वेर्डो निर्माण करताना पारंपरिक पद्धतच वापरलेली होती. पिलाच्या वजनावर लक्ष ठेवून अनेक वेगवेगळ्या जातींचा पुन्हा पुन्हा संकर घडवून हा कोंबडा निर्माण करण्यात आला. कोंबडेझुंजीच्या एका दलालाने वेर्डोसाठी ६,३०० डॉलर्सची किंमत देऊ केली होती; पण कुक्कुटपालकाने त्याला विकले नाही.

मानवप्रजाजननशास्त्रज्ञांचे यासारखे जननप्रयोग कित्येक वर्षे चालू आहेत. त्यांना अजून म्हणण्यासारखे यश आलेले नाही हे खरे. परंतु कॅलिफोर्नियन कुक्कुटपालकाच्या यशस्वी प्रयोगामुळे 'वेर्डोमानव' निर्माण होण्याची शक्यता निखालस नाकारणे कठीण झाले आहे.

—अनंतराव



# गॅरी डेव्हीसचे एक जग–एक सरकार

इंद्रसेन डोंगरे

'हे विश्वची माझे घर' मानणारा गॅरी डेव्हिस केवळ एक स्वप्नाळू माणूस नसून त्यासाठी गेली २०–२५ वर्षे अहोरात्र झटणारा चिकाटीचा व खऱ्याखुऱ्या अर्थाने ध्येयवेडा जीव आहे, हे कदाचित कुणाला खरे वाटणार नाही! त्याची 'एक जग–एक सरकार' ही कल्पना युरोपात मूळ धरू लागलेली आहे हे ऐकून कुणालाही त्याचे कौतुकच करावेसे वाटेल!

आपल्या प्राचीन ऋषिमुनींच्या पावलावर पाऊल ठेवून 'वसुधैव कुटुंबम्'च्या ध्येयाने झपाटलेला हा गॅरी डेव्हिस कोण? कुठला? जिथे 'अपार्थीड' आहे, वंश आणि वर्ण-भेदाचे भूत युरोप–अमेरिकेत आज मितीस थैमान घालीत आहे; आणि जिथे देशोदेशींच्या सीमारेषांवरून रण-कंदन माजत आहे. तिथे 'एक जग–एक सरकार'ची भव्योदात्त पण या दुहीने जर्जर झालेल्या जगात हास्या-स्पदच ठरणार नाही काय?

'एक जग–एक सरकार'च्या आपल्या कल्पनेचा पुरस्कार करून ती साकार करण्यासाठी सातत्याने २५ वर्षे झगडत रहाणारा हा एकांडा, शिलेदार, गॅरी डेव्हिस, जन्माने अमेरिकन आहे. त्याने 'जगाचे नागरिक' हा (वर्ल्ड सिटीझन) एकमेव पक्ष स्थापन केला आहे! एकछत्री जागतिक शासनाचे स्वप्न उराशी बाळगूनच 'लीग ऑफ नेशन्स'चा जन्म होऊ घातला नव्हता काय? पण तिचा उदयास्त जगाला पचवावा लागला आणि तिच्या राखेच्या ढिगाऱ्यावरच गेल्या पाव शतकात 'यूनो' उभी आहे. निदान उभी रहाण्याच्या प्रयत्नात आहे!

'यूनो'मुळे तरी मानवजातीची व्यथा कुठे दूर झालेली आहे? तिने मानवी हक्कांचा जाहिरनामा काढून त्यात जगातील बहुतांश राष्ट्रांना गोवले नाही का? तरीदेखील ही जगन्मान्य संघटना जागतिक शासनाचा भगीरथ प्रयत्न करीत असताना निरनिराळ्या

राष्ट्रांतील युद्धात होणारी जीवित, वित्त आणि साधनसामुग्रीची हानी निमूटपणे पाहत बसण्याचे दुर्भाग्य जगाच्या वाटयाला आलेले आहे, हे नाकारता येणार नाही ! अशा पार्श्व-भूमीवर सन १९७१ च्या ऑगस्ट महिन्यात पॅरिसच्या विश्वविख्यात 'एफेल टॉवर'जवळच्या एका कॅफेच्या मागील प्रशस्त खोलीत उपरोक्त राजकीय पक्षाची स्थापना झाली. यूनोच्या मानवी हक्काचा जाहीरनामा हाच या 'जागतिक नागरिक पक्षा'चा पाया आहे आणि गमत अशी की सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी याच कॅफेनजिकच्या एका चौकातच गॅरी डेव्हिसने जागतिक ऐक्या(वन वर्ल्ड)ची मोहीम चालू केली होती !

त्यापूर्वी असे घडले होते की १९४८ च्या मध्यावर एक दिवस पॅरिस येथील अमेरिकन दूतावासात जाऊन गॅरी डेव्हिसने आपल्या अमेरिकन नागरिकत्वाचा त्याग केला आणि जेथे यूनोच्या आमसभेचे पॅरिस-अधिवेशन चालू होते तेथे जाऊन आपण 'पहिले जागतिक नागरिक' आहोत असे औपचारिकरीत्या जाहीर केले ! आणि मग जागतिक ऐक्याची कल्पना त्याने जगापुढे जोरदारपणे मांडण्यास सुरुवात केली.

त्याचे साधे सरळ म्हणणे असे की, या भूतलावर सर्वांत मोठा धोका मानवजातीस कशाचा असेल तर तो राष्ट्रवादाचा होय ! तेव्हा यूनोने मान्य केलेल्या मानवी हक्काच्या जाहिरनाम्यावर अधिष्ठित अशी एखादी शासनयंत्रणाच केवळ जगाला तारक ठरेल ! निरनिराळ्या देशांना विभागणाऱ्या सीमारेषाच नसत्या आणि सर्व जगाची एकच शासनयंत्रणा असती तर आज जगात संरक्षणाच्या नावे शस्त्रास्त्रावर आणि युद्धावर होणारा लाखो रुपयांचा व्यर्थ खर्च वाचला असता !

आणि अलीकडेच व्हिएटनाम युद्धविरामाच्या वेळी जाहीर करण्यात आलेल्या माणूसहानीच्या, पैशाच्या व शस्त्रास्त्रांच्या आकडेवारीवरून वरील म्हणण्याची सत्यता सहज पटण्याजोगी आहे ! त्याच पैशाने किती मोठे विकासकार्य साधता आले असते. सधन राष्ट्रांतील जादा शेती आणि औद्योगिक उत्पादन अविकसित, गरीब आणि गरजू देशांपर्यंत पोहोचविता आले असते. तसेच जगातील हवापाण्याचे द्रुतगतीने होणारे प्रदूषण थांबविण्याचे उपाय योजता आले असते ! ! शिवाय, 'एक जग—एक सरकार'च्या राज्यात पासपोर्ट आणि व्हिसा यासारख्या गोष्टीची आवश्यकतादेखील उरणार नाही ! ! !

आपल्या या विचारसरणीला अनुसरून गॅरी डेव्हिसने स्वतःजवळ पासपोर्ट, व्हिसा वगैरे कसलीच कागदपत्रे न बाळगता जगात सर्वत्र फिरावयास सुरुवात केली खरी ! पण त्याला निरनिराळ्या ठिकाणी एकंदर १६ वेळेस कारावास भोगावा लागला ! शेवटी १९५३ मध्ये तात्पुरत्या जागतिक सरकारची स्थापना झाल्याची घोषणा करून त्याच्या शासन विभागातर्फे म्हणजे जागतिक सेवा सचनालयामार्फत

देशहीन लोकांना पासपोर्ट देण्यात येतील असेही त्याने जाहीर केले. या शासन विभागाकडून पासपोर्ट घेणारी पहिली व्यक्ती अर्थात डेव्हिस स्वतःच होय !

पुढे काही वर्षांनी विल्यम रीड हा अमेरिकन गृहस्थ आपल्या तीन मित्रांसह डेव्हिसच्या जागतिक नागरिक पक्षास येऊन मिळाला. ही मंडळी आपल्या मिळकतीवर कर भरीत असताना काही रक्कम वजा करूनच प्राप्ती कर भरतात. राष्ट्रीय अंदाजपत्रकात युद्धावर किंवा संरक्षणाच्या नावाखाली जो खर्च केला जाईल त्या प्रमाणात प्राप्तीकरातील रक्कम ते वजा करतात. आपापल्या राष्ट्राच्या सेनादलातल्या प्रमाणेच जागतिक सेवा सेनेचे देखील काम करण्याचा तरुणांना हक्क असावा अशी जागतिक सेवा संचनालयाची शिफारस आहे. समृद्ध राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रास मदत म्हणून अन्नधान्य, औद्योगिक माल पाठवावा आणि कुणालाही जगात कुठेही फिरावयास मज्जाव नसावा अशी या जागतिक नागरिक पक्षाची शिफारस किंवा मागणी आहे.

गॅरी डेव्हिसच्या एकपात्री जागतिक नागरिक संघटनेस येऊन मिळणाऱ्या विल्यम रीड या अमेरिकनाची कहाणी देखील मोठी मनोरंजक आहे. व्हिएटनाम युद्धात बरीच वर्षे काम केल्यानंतर नियमाप्रमाणे सेनादलातून सन्मानाने मुक्त झाल्यानंतर स्वदेशी परतण्याऐवजी त्याने तेथेच राहून युद्धविरोधी प्रचार-कार्य करण्याचे ठरविले. ते पाहून त्याच्यावर कसलाही दोषारोप न करताही त्याला जुलै १९७१ मध्ये तुरुंगात डांबून ठेवण्यात आले आणि नंतर कसलेही कारण न सांगता मुक्तही करण्यात आले ! तेव्हा त्याने सायगाव येथील अमेरिकन दूतावासात जाऊन आपल्या अमेरिकन नागरिकत्वाचा त्याग केला.

त्यानंतर थायलंड देशात बिगर पासपोर्ट फिरत असल्याच्या आरोपाखाली त्याला तुरुंगात टाकले असता, त्याने एका न्यूझिलंडवासी पर्यटकाकडून अखिल जागतिक सेवा शासनाबद्दल आणि गॅरी डेव्हिसबद्दल प्रथमच ऐकले. त्याने लागलीच गॅरी डेव्हिसला पत्र लिहिले. आपली हकीगत कळविली आणि जागतिक सेवा संचलनालयाकडून पासपोर्ट मागवून घेतला. तो लवकरच


शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

आलाही. तो पासपोर्ट पाहून थाई अधिकारी पोटभर हसले पण शेवटी त्यांनी विल्यम रीडला व्हीसा मिळ-विण्यासाठी प्रयत्न करायची परवानगी दिली. तेथून लाओसचा दूतावास जवळच असल्यामुळे तो जाऊन त्यांना भेटला. तेथील अधिकाऱ्यांनी त्याला प्रथम वाटाण्याच्या अक्षता लावल्या पण रीडने जेव्हा यूनोच्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्याची प्रत त्यांना दाखविली. तेव्हा त्यांनी त्याला व्हीसा बहाल केला. त्या जाहिरनाम्यावर ज्यांनी सह्या केल्या त्या राष्ट्रांपैकी लाओस एक होय.

लाओसवरून सुरुवात करून रीडने अशाच प्रकारे भारत, पाकिस्तान, अफगाणिस्थान, तुर्कस्थान, केनया, इराण, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, इटाली व ऑस्ट्रीया देशामधून पर्यटन केले. शेवटी जेव्हा तो फ्रान्समध्ये जाऊन पोहोचला तेव्हा त्याने देशविहीनांच्या ब्युरोत आपले नाव नोंदविले.

यूनोचे सरचिटणीस डॉ. कुर्त वाईल्ड हॅमच्याच एका अलीकडील वक्तव्याच्या आधारानेच गॅरी डेव्हिसला आपल्या 'जागतिक नागरिक पक्षा'ची स्थापना करावयास प्रेरणा मिळाली. आत्ता तो यूनोमध्ये एक स्वतंत्र जागतिक प्रतिनिधी म्हणून प्रवेश मिळविण्याच्या खटपटीत गुंतलेला आहे. हे जागतिक प्रतिनिधीत्व प्राप्त करून घेण्यासाठी त्याने दहा लक्ष सह्या मिळवून जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठी कमर कसलेली आहे !


गॅरी डेव्हिसचे असे म्हणणे आहे की जास्तीत जास्त लोकांनी जागतिक नागरिकत्वाच्या कल्पनेला वरले पाहिजे. आपापल्या शहराशी अथवा आपापल्या देशाशी एकनिष्ट राहून देखील अखिल मानव कुटुंबाची, त्याच्या हक्कांची नि कर्तव्यांची जाणीव प्रत्येकाने बाळगायला हवी. पंचवीस वर्षे सातत्यानं आपलं ध्येय कृतीत उतरविण्याकरिता झगडणारा गॅरी डेव्हिससारख्या चिकाटीचा माणूस या भूतलावर विरळाच !

जरी डेव्हिसला आजपर्यंत मिळावा तसा प्रतिसाद जगातील निरनिराळ्या देशातून मिळाला नसला तरी युरोप अमेरिकेतील शांततावादी लोकांचा त्याला वाढता पाठिंबा मिळत आहे. प्रसिद्ध अमेरिकन अभिनेता पीटर फोंडा याने देशविहीन लोकांना प्रवास करण्यासाठी आपल्या मालकीचे एक जहाज 'जागतिक नागरिक पक्षा'ला बक्षिस देऊन टाकले आहे.

या पक्षाची माहिती विचारणारी अनेक पत्रे जगाच्या कोनाकोपऱ्यातून रोज येत असतात. जागतिक सेवा शासनाने दिलेल्या पासपोर्टला मान्यता प्राप्त होऊ लागल्याचे अनेकांना माहित झाले आहे. त्यामुळे आपल्या देशाचे पासपोर्ट स्वतःजवळ असताही अनेक लोक जागतिक सेवा संचलनालयाचे देखील पासपोर्ट आपल्यापाशी बाळगू लागले आहेत. हे गॅरी डेव्हिसच्या चिकाटीचे आणि यशाचे गमकच नव्हे काय ?

● ● ●





सौ. सुखमणि रॉय

अंगभर जडावलेला थकवा, मरगळ सुस्ती...मनावर आलेलं नकोपणाचं सावट...वाचनाच्या ऐतखाऊपणानं बधीरशा झालेल्या वृत्ती आणि तरीही पुन: या सर्वांचा मनस्वी दाटून येणारा गळाभर जड होणारा नकोपणा.

याच्या कवचाला तडे जाणार आहेत का ? त्या तड्यांची वाट पहात आहे. खूप वेळेस मनात येऊन जातं...काही-तरी लिहावं, कुठंतरी बोलाव, घुसमट-णारा जीव मोकळा मोकळा करावा. पुष्कळदा पांढऱ्या ढगाच्या पुंजक्यासारखं काहीतरी जाणीवात तरंगत राहतं. त्या सगळ्यात गुंतून पडलेलं माझं मी-पण मला त्यातून सोडवताच येत नाही.

आपण लिहितो—म्हणजे आपणा

बाहेर जाऊनं काहीतरी करतो, नाही का ? इथं हे 'मी' पण मुळी वेढयावर वेढे वाढवतयच आणि तू म्हणतोस– मला याची पर्वा उरली नाही म्हणून.

मला सांगता येत नाही, पण कळतंय जरूर. तू म्हणतोस तसं खासच नाही. भोवतालच्या पसाऱ्यात तुला मी रमलेली वाटते स्वतःची ओळख विसरून जाण्याएवढी. मला नेमकं याच्या उलट वाटतं. स्वतःच्या पसाऱ्यात मी इतकी बुडाले आहे आहे की बाहेरच्या जगाची ओळख सावलीसारखी वाटते. स्वतःचं स्वतंत्र अस्तित्व नसल्यासारखी.

हल्ली माझा विचार माझ्या मनात येतो तो एक अजगर बनून. भक्ष्य गिळंकृत करून कुठल्यातरी झाडाला जबरदस्त विळखे घालून लोंबकळणारा आत्मतुष्ट अजगर.

कुणीतरी म्हटलंय–की कुठेतरी वाचलंय...आठवत नाही. बुद्धीला शीण घेण्याची चपळ वृत्ती कुठे दडली आहे कोण जाणे... म्हणे की माणसाची सुरक्षिततेची भावना त्याचा सर्वात मोठा शत्रू आहे. त्यात वस्तुनिष्ठ सत्याचा अंश किती कोण जाणे. पण माझ्या पुरतं मला हे पटतं. आई, बाप, काका, मावशांच्या नांदत्या घरातून चारचौघीपण पांघरून त्याच उबाऱ्यात वाढलेली मी नेमून दिलेल्या नात्यागोत्यांना जवळीक देत घेत शाळा-कॉलेजपर्यंत शिकलेली अन् त्यात आता माझा मी थोडया आक्रस्ताळीपणानंच पण सदैव माझ्याकरता म्हणून मिळवलेला तू–तुम्हा साऱ्यांच्या आवरणात मी किती सुरक्षित आहे–

इतकी की बाहेरच्या जगानं केलेलं कुठलंही आव्हान तुमच्या ढाली पुढे करून बचावाच्या धोरणानं (पुन: मी लढाई जिंकली असल्याच्या थाटात !) अव्हेरावं आणि करीन त्या गोष्टीच्या समर्थनासाठी पुन: तुमच्याच तोंडाकडे पहावं. किंबहुना मी फक्त वागेन करीन. समर्थनाला जबाबदार माझी माणसं... माझी परिस्थिती. किती सरळ सोपं सोयीस्कर आहे जगणं.

तुला खोटं वाटलं. त्या दिवशी प्रिन्सिपॉलनी माझ्या राखेवर फुंकर घालून विझत चाललेल्या मला शोधण्याचा प्रयास केला. त्या रात्री स्वतःला शिव्या देत निर्भत्सना केली माझी मीच. रात्रभर तळमळले...खरे–कीव केली स्वतःची.

पण पुन: सकाळ उगवल्यावर सगळचा दवाचं निमूपटणं बाष्प झालं–तशी कुठं काही उणं नाहीच–आणि करतेय ते सर्व बरोबरच, अशो स्वतःची समजूत घालीत साळसूद चेहऱ्यानं वावरायला सुरुवात. किती दिवस फसवणूक करायची आपलीच आपण.

परवा माझ्याच अल्बममधले फोटो बघत बसले होते– (सध्या हे असलेच उद्योग करीत असते मी. रिकामी नाही आणि जिवंत आहे याची खात्री करून देत असते–माझी मीच.) ४–६ वर्षांपूर्वीचा शाळेतून नुकत्याच थोडया मोठया वलयात प्रवेशलेला माझा फोटो आणि कॉलेजच्या शेवटच्या वर्षाचा माझा फोटो. सहज चाळा म्हणून मनातल्या मनात तुलना केली. अवघड वाटलं कबूल करताना, स्वतःशी-

किती बदलले आहे मी. किती नकळत मुली स्वत:वरचा आपला ताबा सोडायला राजी असतात. असं वाटतं, ही मधली चार सहा वर्ष पुसून टाकावीत आणि पुन: शोध घ्यावा—त्या माझा.

ब्लेकनं म्हणे काही कविता अशा लिहिल्या की त्यांचेच Song of innocence आणि Song of experience अशा दोन परींनी दोन वेगळे, परस्पर विमुख अर्थ लागावेत आणि आपलं ही तसंच नाही का ?

चार सहा वर्षांपूर्वी माझ्या एका परिचित प्रौढानं मला म्हटलं "तुम्ही सुजाण आहात, तुमचं मानसिक वय नक्कीच तुमच्या असलेल्या वयापेक्षा ४–५ वर्ष तरी जास्त आहे. पण तुमच्या जवळ नाही तो ती ४–५ वर्ष प्रत्यक्ष जगल्याचा अनुभव. त्यामुळं फार फरक पडतो."

त्यावेळी हे विधान पटलं नाही आणि आता त्याच्या खरेपणाचा प्रत्यय येतोय. पण किती विपरीतपणानं. ४–५ वर्षांनी मी ही अशी दिसेल अशी त्या प्रौढाची नक्कीच कल्पना नव्हती.

मग या बदलाला जबाबदार कोण ? उत्तर शोधण्याला, किंवा सापडलं तरी उत्तराला फारसा अर्थ नाही बदल झाला आहे. आणि म्हणूनच अर्थ आहे फक्त प्रश्नाला, प्रश्न मनामधे मांडणाऱ्या प्रक्रियेला. सांग, आहे ना मी स्वत:त बुडलेली इतकी की जागृत मनाच्याची पातळया उमगू नयेत. डोळ्यांसमोर चित्रपटांतलं दृश्य दिसत असावं, शब्द कानी पडत असावेत आणि तरीही अर्थबोध होऊ नये—हे कल्पनेत तरी कुणाला खरं वाटेल ?

आज अट्टाहासानं बसले आहे, अपघातानं आघात होऊन पुन: जाणीवा जागतील म्हणून वाट बघण्यात खूप काळ दवडला आहे. पण मुर्दाड झालं तरी मन आहे. नकोपणाची ही ग्रासणारी भावना आज अणकुचीदार झाली आहे. कळवळून उठले आहे.

ही स्नेहप्रभा विचारते आहे—' वहिनी काय लिहिता एवढं मन लावून ?—माझा हा परका परका चेहरा—लिहिताना चेहऱ्यावर उमटणाऱ्या बर्बरतेच्या रेषा आणि झपाटल्यासारखं कागदावर कागद लिहित सुटला—

तिच्या ओळखीच्या तिच्या नेहमीच्या, सवयीच्या, सामाजिक वहिनीचा मागमूसही तिला आता दिसत नसेल माझ्या चेहेऱ्यावर. तिला आश्चर्य न वाटल तरच नवल तिच्या मते हसून खेळून थट्टा-मस्करीत रम घेण्याचे हे दिवस माझे. परवाच तर गेलास तू. अजून १० दिवस नाहीं झाले पुरे आपल्या लग्नाला.

" वहिनी, मन लागत नाही का या घरी अजन ? दादा लौकर गेल्यामुळं उदास झालात ? आज रात्रीच्या शोला जायचं का ?"

काय उत्तरं देऊ तिला ?—हा प्रश्न नेहमीच्या सवयीनं तुला विचारणार होते. पण थबकले आहे. खूप पोहून दमल्यावर किनाऱ्याला लागाव आणि किनाऱ्यानंच स्वत:ला पाण्यात लोटून द्यावं तसं झालं आहे.

इथेच, इथेच कदाचित खात्री पटेल मी अजूनही जिवंत असल्याची. ● ● ●



## जबानी चौथी । शेवटचो हप्ता सातवा

लेखक : नारायण सान्याल

अनुवादक : अशोक शहाणे

ह्याच्यानंतर आणखी अडीच महिने मी अन् अन्वर रणांगणावर होतो. शेजारी शेजारी. पोपाकाउकपाडांग ताउंगजिन--काव्यू लेगी ह्या रणांगणावर. थोडक्यात म्हंजे पोपा सेक्टरमधे. तिथंच.

कोहिमा-इंफाळच्या रणांगणाप्रमाणं इथंही आझाद हिंद सैनिकांनी बेहद्द शौर्य गाजवून प्राण वेचले पण युद्धाच्या ह्या शेवटच्या पर्वात ह्याच रणांगणावर एक लांछनामय दृश्यपण बघितलं होतं मी. आमच्यातले बरेचसे सैनिक अन् ऑफिसर्स शत्रूला मिळाले होते. देशबांधवांचा, देशाचा, सेनेचा विश्वासघात करून. ही माझ्या डोळ्यासमोर घडलेली गोष्ट आहे. सत्याखातर तीपण सांगून टाकतो इथं.

मार्चच्या पहिल्या आठवड्यात आम्ही पोपा रणांगणात जाऊन पोचलो. मी, अन्वरभाई, बागडी अन् खान महंमद. ह्या रणांगणाची भौगोलिक रचना अन् दोन्ही पक्षांच्या सैन्याची मांडणी आधीच

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय

सांगून ठेवली तर समजायला सोपं जाईल. भौगोलिक वर्णनाकरता अर्थातच नकाशा बरा पडेल. ह्या रणांगणाशी आमच्या मुख्य छावणीचा दोन प्रकारे संबंध होता. दोन ठिकाणांहून. ही दोन ठिकाणं म्हंजे रंगून-मंडाले रेल्वेलाइन-वरची दोन स्टेशनं. दक्षिणेला मिकटिला अन् उत्तरेला म्यिनजान. आता मी ज्यावेळची गोष्ट सांगतोय्, त्यावेळी म्यिनजान शत्रूच्या ताब्यात होतं. त्यामुळं बाहेरच्या जगाशी आमचा संबंध निव्वळ मिकटिल्यातनंच होता. ह्या रणांगणाला उत्तर-पश्चिम वळसा घालून इरावती नदी वहात होती. ब्रिटिश सैन्य नाना ठिकाणी ही नदी ओलांडून ह्या रंग-मंचावर यायला पहात होतं. दोन ठिकाणी नदी पार करायचा ते जिवा-पाड प्रयत्न करत होते. ही दोन ठिकाणं म्हंजे न्यांगू अन् पोकाकू.

इथले रेजिमेंटल कमांडर होते मेजर जी. एस. धीलन अन् त्याचे सहकारी होते मेजर जागीरसिंग. त्यांनी सैन्याची रचना अशी केली होती :

पायदळाची दोन नंबरची तुकडी मेजर पी. के. सैगलांच्या नेतृत्वाखाली पोप्याला एक खंबीर ठाणं बनवतील अन् शत्रूच्या हल्ल्याकरता कायमच तयार राहतील.

काउकपाडांग-न्यांगू रस्त्याच्या दरम्यान शादी अन् ताउंगजिन टापूच्या-आसपास नेहरू ब्रिगेडच्या वेगवेगळ्या तुकड्या लपून रहातील. वेळप्रसंगी ते गनिमी काव्यान लढतील.

आम्ही पोपा आघाडीवर पोचलो म्हंजे मार्चच्या पहिल्या आठवड्यात—तेव्हा आम्हाला बातमी मिळाली, की काही ब्रिटिश सैन्य आधीच इरावती नदी ओलांडून इकडं आलंय् म्हणून. पोपा पहाडात पोचल्या-पोचल्या तिथल्या आझाद हिंद सैनिकांनी मोठ्या उत्साहानं आमचं स्वागत केलं. ते आम्हाला छावणीत घेऊन गेले. थोड्या थोड्या अंतरावर काही तंबू ठोकले होते. शिवाय बांबू अन् जंगली वेलींनी काही शेड्स बनवल्या होत्या. आम्हाला दोघांना त्यांनी एकाच छावणीत जागा दिली.

मेजर धीलन तेव्हा तिथं नव्हते. त्यामुळं आम्हाला रिपोर्ट करावा लागला कॅप्टन रियाजकडे. त्यानंच आम्हाला आमचं रात्रीचं आसऱ्याचं ठिकाण दाखवून दिलं.

संध्याकाळ झाल्यावर एका झाडाखाली बसून ह्या आघाडीवरची परिस्थिती त्यांनी आम्हाला समजावून सांगितली.

नव्या नव्या लोकांशी ओळखी झाल्या. सिंगापूरला जपान्यांच्या हाती सापडायच्या आधी कॅप्टन रियाज चौदाव्या पंजाब रेजिमेंटमधे होता. म्हंजे कर्नल शहानवाज अन् अन्वर हुसेन ज्या बटालियनमधे होते, त्याच बटालियनमधे कॅप्टन रियाजपण होता. अन्वरची अन् त्याची आधीपास्नंच ओळख होती.

कॅप्टन बागडी न् खान महंमदपण फार दिलखुलास माणसं होती. गप्पात संध्याकाळ चांगली गेली आमची. लांबनं तोफांच्या धुमधडाक्याचा आवाज येत होता, पण इथं काही धांदल नव्हती.

रात्री कॅप्टन रियाजनं आमच्या चौघांपैकी दोघांना जेवायला बोलावलं. खान महंमद न् अन्वरला. हे काही मला बरं वाटलं नाही. एक म्हंजे आम्ही चौघं अधिकारी इथं नवीन आलो होतो. मला न् बागडींना वगळून उरलेल्या दोघांना जेवायला बोलावणं म्हंजे दिसायलादेखील बरं दिसणार नव्हतं.

बागडी म्हणाले—आपल्याला निषिद्ध असा काही बेत असेल त्यांचा—

मी त्यांना मधेच अडवून म्हणालो—पण आघाडीवर आमंत्रण विमंत्रण तरी काय लावलंय्! कोहिमा आघाडीवर असलं काही बघितलं होतंत तुम्ही? तिथं आपण सगळे बरोबरच जेवायचो की!

बागडी नुस्तंच हो म्हणाले.

पण हे काही एवढ्यावरच संपलं नाही.

जेवणखाण आटपून रात्री अन्वर परत आला तेव्हा मी जागाच होतो. बारा वाजले असतील बहुतेक. दिवसभर चालण्यानं थकून गेलो होतो; पण दोस्त परत येईपर्यंत काहीकेल्या झोप आलीच नाही. शेडमधे दोनच बिछाने होते. त्यातला एक रिकामाच होता.

तर मध्यरात्री अन्वर आला. बूट न् कपडे न काढता तसाच गवताच्या बिछान्यावर पसरला. खिशातनं एक सिगारेट बाहेर काढून त्यानं ती पेटवली.

मी विचारलं—कसंकाय झालं जेवण?

झट्दिशी अन्वर उठून बसला.

म्हणाला—तू अजून जागाच, दोस्त?

—हो, मी जागाच आहे? जेवणखाण कसंकाय झालं?

अन्वरनं काही माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाही. पाय न वाजवता तो उठून बाहेर गेला. चोहीकडे नजर टाकून घेऊन तो माझ्या बिछान्यावर येऊन बसला.

कुजबुजत म्हणाला—दोस्त, मला तरी काही लक्षण बरं दिसत नाहीय्! वाटतंय्—

—काय वाटतंय्?

सिगारेटवर दोन लांबलचक झुरके मारून घेऊन अन्वर म्हणाला—छया:! तुला सगळंच सांगतो!

अन् अन्वरनं मला सगळंच सांगितलं.

कॅप्टन रियाजनं आदरातिथ्यात काही उणीव ठेवली नव्हती. जेवण झालं होतं रियाजच्या तंबूतच. आणखीही एकाला त्यानं आमंत्रण दिलं होतं. हवालदार महंमद शर्वर.

पहिल्यांदा इकडच्या-तिकडच्या गप्पा-गोष्टी झाल्या. सुरुवातीला सगळेच मजेत होते. रियाजनं व्हिस्कीची एक बाटली काढली. सगळे जरा जवळ सरकून बसले.

बोलता-बोलता गप्पांनी एकदम एक भलतंच वळण घतलं. भारतीय राजकारणाचा विषय निघाला.

कॅप्टन रियाज म्हणाला—गेल्या वर्षी सेप्टेंबर महिन्यात मुंबईला बॅरिस्टर जिना न् महात्मा गांधी ह्यांच्यात हिंदू-मुसलमानांच्या हक्कांच्याबद्दल लांबलचक चर्चा झाली, अशी बातमी आपल्याला मिळाल्याय्. इंग्रजलोक भारत सोडून गेले की हिंदू भारतीय मुसलमानांच्यावर अत्याचार करतील अशी भीती जिनांना वाटत होती. गांधींना काही ह्या बाबतीत जिनांचं समाधान करता आलं नाही.

रियाज पुढं म्हणाला—मग कॉंग्रेसच्या कार्यकारिणीतले भुलाभाई देसाई न् मुस्लिमलीगचे नबाबजादा लियाकतअली यांनी संयुक्त मंत्रीमंडळ बनवायची सूचना केली. ह्या सूचनेवर विचार करण्याकरता लॉर्ड वेव्हेल सध्या इंग्लंडला गेलेयत्—

अन्वर हुसेनला राजकारणातलं काहीच समजायचं नाही. पण बुद्धी फार तल्लख होती त्याची. त्यानं एक साधासा प्रश्न केला—कधी गेले ?

—ह्याचं महिन्यात. मार्च.

रियाज म्हणाला. अन् त्यानं परत बाटलीतनं दारू ओतली.

—इतकी अलीकडची बातमी तुला कशीकाय मिळाली ?

—ऑल-इंडिया रेडिओवरनं !

—मग म्हणून काय झालं ?

रियाज आणखी जवळ सरकून म्हणाला— आपण तर तळहातावर शिर घेऊन आझादीकरता लढतोय्; पण मग हिंदूंनी जर गादी बळकावली न् आपल्यावर अत्याचार सुरू केले तर ?

अन्वर म्हणाला-- तसं कसं होईल ? नेताजी आहेतच की !

आता काय उत्तर द्यावं ते रियाजच्या लक्षात येईना.

तेव्हा लेफ्टनंट शर्वर म्हणाला—पण नेताजी काही अमरपट्टा घेऊन आलेले नाहीत !

अन्वर म्हणाला-- बरं, मग काय करावं असं तुमचं म्हणणं आहे ?

ह्या प्रश्नाचं सरळ उत्तर न देता रियाज म्हणाला— दुसरी गोष्ट म्हंजे तुर्कस्तानपण आता मित्रपक्षाला मिळालाय्. म्हंजे आपण आझाद हिंद सेनेतनं लढायचं म्हंजे आपल्याला तुर्कस्तानच्या विरुद्धपण लढावं लागणार. म्हंजे खरंतर इस्लामविरुद्धच !

अन्वर वैतागून म्हणाला— कुठं तुर्कस्तान न् कुठं ब्रह्मदेशचं जंगल !

मग शर्वरपण वैतागून म्हणाला—मुद्दा तुझ्या लक्षात आलेला नाही ! ह्या लढाईत आपण हरणार हे पक्कं आहे.

ब्रिटनला आता कुणीच थोपवू शकणार नाही! जर्मनी तर हरल्यासारखीच झालीय्! जपानचापण टिकाव लागायचा नाही!

त्याला थांबवून अन्वर म्हणाला—पण मग तुमच्या मनात काय आहे ते स्वच्छ सांगा ना!

रियाज म्हणाला—काय करावं तेच धड कळत नाहीय् ना! म्हणून तर तुझा सल्ला हवाय्! तू काय करायचं ठरवलंय्स? इथं गोळी खाऊन मरणारायस?

—अलबत्! तसाच तर आदेश देऊन गेलेय्त नेताजी रंगूनला जायच्या-आधी!

—ते तर बोलूनच सुटले! मरायला तर आपल्यालाच लागणाराय्! हे आणखी आणखी मागं हटत जातील! इंफाळ-कोहिमात आपल्या चार हजार लोकांनी प्राण वेचले—हे मागं आले! आता पोप्याला आपल्याला बळी जाण्याकरता पाठवून हे गेले निघून रंगूनला!

ठण्णदिशी दारूचा ग्लास खाली ठेवून अन्वर उठून उभा राहला.

म्हणाला—बस्! खूब!

टोपी उचलून तो जायला निघाला.

शर्वर त्याचा हात धरून म्हणाला—नाराज का होतोय्स दोस्त? तुझा जबाब देऊन जा!

—नाही!

वज्रगंभीर स्वरात अन्वर म्हणाला.

—आत्ताच तुमचं निमक खाल्लंय्. पचलेलंही नाही अजून! नाहीतर ह्या प्रश्नाचं उत्तर दिलं असतं मी! तोंडानं नाही—रायफलच्या ट्रिगरनं!

अन् एकाच झटक्यात हात सोडवून घेऊन अन्वर परत फिरला होता.

सगळं ऐकल्यावर मी म्हणालो—हे तू ठीकच केलंस अन्वरभाई!

—पण मला का-कोणजाणे काही बरं वाटत नाहीय् दोस्त! इथली हालचाल काही बरी दिसत नाही!

त्या दिवशी खूप रात्रीपर्यंत आम्हाला दोघांनाही झोप आली नाही.

पण दुसऱ्या दिवशी सगळंच प्रकरण मिटून गेलं. रियाज न् शर्वर आले. मोकळेपणानं त्यांनी अन्वरची माफी मागितली.

म्हणाले—काल दारूच्या नशेत काय बोललो कोणजाणे! तू मनावर घेऊ नकोस!

अन्वर फक्त एवढंच म्हणाला की—अच्छा! पण एक गोष्ट सांगून ठेवतो. दारूच्या नशेत जर असल्याच गोष्टी तुमच्या डोक्यात येत असतील, तर दारू घेऊ नका परत!

त्याचदिवशी संध्याकाळी आमच्या कँपमध्ये एक हेर सापडला. इसम चट्टग्रामचा मुसलमान होता. ब्रह्मदेशात येऊन ब्रह्मी बाईशी लग्न झाल्यामुळं तयार झालेल्या संकर जमातीला जेरबादी म्हणायचे. हा इसमपण जेरबादीच होता. त्याला हिंदीपण येत होतं. ब्रह्मीपण येत होतं.

आमच्या कँपच्या शेजारी डोक्यावर पाटी घेऊन तो फिरत होता. ते पाहून संत्र्याला संशय आला. त्यानं पाटीवाल्याला रोखलं. पाटीवाला म्हणाला,

शाकसब्जीचा ठेका घेण्याकरता म्हणून कॅंप कमांडरला भेटायला आलोय् आपण.

तरी पहाऱ्यावर असलेल्या मनसुखलालचा संशय जाईना. म्हणून त्यानं एकदम झडती घ्यायला सुरुवात केली. त्याच्या पाटीत कांदे-बटाटे होते अन् कांद्याबटाट्यांच्या खाली लपवलेले होते दोन हातबॉंब !

आपण सापडलोय् असं लक्षात आल्याआल्या त्या पाटीवाल्यानं पळायचा प्रयत्न केला. पण मनसुखलालनं न् त्याच्या सोबत्यानं मिळून त्याला पक्कं पकडलं

आरडाओरडा ऐकून मी न् अन्वरभाई धावतच तिकडे गेलो. तोपर्यंत तो माणूस पुरता ताब्यात आला होता.

अन्वरनं आपल्या वाघासारख्या पंज्यानं त्याची कॉलर धरली. अन् तो कड्डाडून म्हणाला—बोल कमबख्त ! कशाला आला होतास इथं ?

दोन्ही हात जोडून अर्धवट ब्रह्मीत न् अर्धवट हिंदीत त्या पाटीवाल्यानं जे सांगितलं त्याची गोळाबेरीज अशी—आईशप्पथ सांगतो, तरकारी विकायला आलो होतो. रस्त्यात हे सापडले. काय आहे मला ठाऊक नाही. मी आपले उचलून टोपलीत टाकले.

मी म्हणालो—अन्वरभाई, आपण ह्याला कमांडरकडे पाठवलेलं बरं. मग काय विचारायचंय् ते तेच विचारतील.

—पण रेजिमेंटल कमांडर आत्ता इथं नाहीत ना !

ते बरोबर आहे. मेजर धीलन, मेजर सैंगल आणि मेजर जागीरसिंग असे तिघंही इरावती नदीच्या तीरावर शत्रूचं कितपत सैन्य आहे ते बघायला गेलेयत. कुणी ताउंगजिन-पागान-न्यांगूच्या वाटेनं, कुणी शादी-प्यिनबिन-पोकोकूच्या सडकेनं, तर कुणी लेगी-माहलेंच्या बाजूला.

तेवढ्यात हेर सापडलाय् ही बातमी पसरली होतीच. बरेचजण जमा झाले. त्यातनं हवालदार महंमद शर्वर पुढं येऊन म्हणाला—ह्याला कॅप्टन रियाजकडे घेऊन जा ना ! तोच तर आत्ता इन-चार्ज आहे.

हेही ठीकच आहे की. लष्करी व्यवस्थेत कुठलीच जबाबदारीची जागा कधी रिकामी नसते. एकाच्या गैरहजेरीत ही जबाबदारी कुणावर असेल ते सगळं आधीच ठरलेलं असतं. तेव्हा तूर्त पोपा टेकडीवरच्या ह्या रेजिमेंटचा कर्णधार होता सीनियर-मोस्ट ऑफिसर कॅप्टन रियाज.

हवालदार शर्वर म्हणाला—ह्याला बांधून टाका न् पोचवून द्या कॅप्टन रियाजच्या तंबूत. आज रात्रीच मेजर धीलन परत येतील. तेव्हा काय तो फैसला होईल.

पाटीवाल्याला बांधून मनसुखलाल, शर्वर न् मदन निघून गेले कॅप्टन रियाजच्या तंबूकडे.

गर्दी विखुरली. आम्हीपण परतलो.

खरंच त्याच रात्री मेजर धीलन न् मेजर जागीरसिंग आले.

त्यांच्याकडनं नदीच्या काठची अगदी अलीकडची खबर मिळाली. सत्तावीस फेब्रुवारीला शत्रूची रणगाड्यांनी सज्ज

असलेली एक तुकडी काउकपाडांगच्या मार्गानं छाऊ ओलांडून 'पोजू'ला येऊन ठेपली होती. तिथं टेहळणी करणाऱ्या आमच्या एका तुकडीशी त्यांची चकमक उडाली. आमच्या सैनिकांच्याजवळ रायफलखेरीज दुसरं शस्त्रच नव्हतं. तेव्हा ते आपले शत्रूच्या रणगाड्यांवर गोळ्या झाडत राहिले. ह्याचा काहीच उपयोग नाही हे त्यांना कळत होतंच. रणगाडा रायफलीच्या गोळ्यांना काय भीक घालणार! पण आश्चर्य म्हंजे तेवढ्यानंच गांगरून शत्रूनं माघार घेतली होती. अन् त्यांगूच्या शेजारी--आमच्या छावणीपास्न आठेक मैलांवर--त्यांनी तळ ठोकला होता.

मेजर धीलन कँपमधे पोचले तेव्हा बारा वाजले होते रात्रीचे. आल्याआल्या त्यांनी सगळ्या ऑफिसरांना बोलवून घेतलं. आमच्या मोहिमेची पुढची योजना तयार करायला हवी.

पधरा मिन्टांच्या आत आम्ही त्यांच्या तंबूसमोर जमा झालो. अर्धगोल करून बसलो. मधे एक दगड ठेवला होता. ते कमांडरचं आसन.

मेजर धीलन त्याच्यावर बसले. म्हणाले--तुम्ही सगळेच जमलेले आहात. आपल्याला काही महत्त्वाचे निर्णय घ्यायचेयत. ताउंगजिन न् शादीच्या टापूत आपल्याला तातडीनं काही रि-इनफोर्समेंट पाठवावी लागेल. दोन तुकड्या बनवायच्यायत. कोण कोणत्या तुकडीत असणार तेपण आत्ताच, पक्कं करून टाकू या. म्हंजे उद्या सकाळीच तुम्हाला कामगिरीवर निघता येईल.

नंतर आमच्यावर नजर फिरवून म्हणाले -- काही नवीन ऑफिसर्स आलेले दिसतायत.

कॅप्टन खान महंमद उभं राहून म्हणाले--हो! आम्ही चौघं नवीन आलोय मिकटिल्याहून. काल जॉइनिंग रिपोर्ट दिला. ते कागदपत्र तुमच्याकडे आले नाहीत वाटतं अजून. तर आम्ही स्वतःच आपापली ओळख करून देतो. मी कॅप्टन खान महंमद. एक नंबर डिव्हिजनच्या आझाद ब्रिगेडमधल्या बी कंपनीचा नायक होतो मी.

नंतर कॅप्टन बागडींनी उठून आपली ओळख करून दिली.

मी न् अन्वरनंपण नाव सांगितलं. बाकीची माहिती सांगितली.

मेजर धीलन म्हणाले--तुमच्यासारखे शूर न् अनुभवी ऑफिसस माझ्या रेजिमेंटमधे आलेयत हे बघून मला फार आनंद झाला. मी तुमच इथं स्वागत करतो. पण तुमचे कागदपत्र मला आत्तांच हवेयत. कुठाय्, कॅप्टन रियाज कुठाय्?

तेव्हांशी कुठं सगळ्यांच्या लक्षात आलं की कॅप्टन रियाज इथं हजर नाही म्हणून!

मेजर जागीरसिंगनी लगेच कॅप्टन रियाजच्या तंबूकडे एक माणूस पाठवला त्याला बोलवून आणायला.

दोन मिन्टांतच परत येऊन तो म्हणाला--कॅप्टन रियाज काही तंबूत नाही!

--म्हंजे! रात्री कुणालाच छावणीच्या बाहेर जायची परवानगी नाही!

अन्वर हुसेन उठून उभा राह्यला. म्हणाला--आज संध्याकाळी एक ब्रिटीश गुप्तहेर सापडला होता. त्यालापण कॅप्टन रियाजच्या जिम्मेदारीवर त्याच्या तंबूतच हातपाय बांधून ठेवलं होतं! तो कुठाय्?

बोलवायला गेलेला माणूस म्हणाला —तंबूत कुणीच नाही!

मेजर धीलन न् जागीरसिंगनी एकमेकांच्याकडे पाह्यलं. अमंगल वातावरणाचं मळभ दाटून आल्यासारखं होऊन गेलं अचानक.

मेजर धीलन जरा चुळबुळत म्हणाले —कॅप्टन रियाज कुठाय्? त्याचा पत्ता लावायला हवा आधी!

ताबडतोब परत एकदा उठून अन्वर हुसेन म्हणाला—ह्याचबरोबर हवालदार महंमद शर्वरपण बेपत्ता झालाय् की नाही ते बघून घ्या सर!

—का?

मेजर धीलननी विचारलं.

—कारण तुम्हाला इतक्या लोकांच्यांत सांगता यायचं नाही सर!

मेजर धीलन काहीच बोलले नाहीत.

हवालदार महंमद शर्वरचापण कँपमधे काही पत्ता लागत नाही अशी बातमी थोड्याच वेळात आली!

तो ज्या शेडमधे राह्यचा, त्याच शेडमधे आणखी दोघं रहात होते. उत्तर प्रदेशातला हवालदार मदन अन् नेताजींच्या देशातला दे नावाचा एकजण. ह्या तिघांचापण काही पत्ता नव्हता!

आमचे रेजिमेंटल कमांडर अत्यंत बेचैन झालेले दिसले. मशिनगनच्या अखंड माऱ्यातदेखील मेजर धीलन अगदी शांत असायचे. पण ह्या प्रकारानं मात्र एकदम गांगरून गेले. उठून उभे राहताराहता ते म्हणाले—ही बैठक आपण इथंच संपवू या! आणखीही कुणी बेपत्ता झालंय् का काय ह्याचा आधी शोध घ्यायला पाह्यजे!

नंतर कॅप्टन अन्वर हुसेनकडे वळून म्हणाले—तुम्ही तेवढे माझ्याबरोबर चला.

मग त्यादिवशी मध्यरात्र उलटून गेल्यावर आम्हाला फॉल-इन व्हावं लागलं. गिनती झाली. हो, ह्या चौघांच्या खेरीज बाकी सगळे होते! आमच्या ठाण्यांतनं चौघं प्राणी हरवले होते. ते मारले गेले नव्हते, जखमी होऊन इस्पितळात गेले नव्हते—ते निव्वळ हरवून गेले होते! रियाज, मदन, शर्वर न् दे.

पण नाही? चारजण कसे! पाचजण! आणखीही एकजण बेमालूम दिसेनासा झाला होता! तो जेरबंदी ब्रिटिश गुप्तहेर!

अन् निव्वळ एवढंच नाही! तपास घेतल्यावर कळून आलं—त्यांनी आपल्या रायफलीही बरोबर नेल्यायत! अन् त्याहीपेक्षा भयंकर म्हंजे रेजिमेंटल कमांडरच्या गैरहजेरीत जे नकाशे न् फायली कॅप्टन रियाजच्या हाती सोपवलेल्या होत्या, त्यातले काही महत्त्वाचे न् गुप्त कागदपत्र गायब झाले होते! हे सगळ्यात लाजिरवाणं होतं.

मेजर धीलननी डोक्याला हात लावला!



# डोकं दुखतंय् ?

## प्रभावी आणि विश्वसनीय ॲनासिन त्वरित आराम देते



"माझं डोकं पुष्कळदा दुखतं. ॲनॅसिनपासून मला खराखुरा आराम मिळतो." बँकेत अधिकाराच्या जागेवर काम करणारे श्री. सुरेश देसाई यांचं हे मत.

**प्रभावी :** जगभर डॉक्टर्स ज्याची शिफारस करतात असे वेदनाशामक द्रव्य ॲनासिनमध्ये अधिक प्रमाणात असते. ॲनासिनमुळे वेदनांपासून त्वरित आराम मिळतो.


**विश्वसनीय :** श्री सुरेश देसाईसारख्या लक्षावधि व्यक्तींचा ॲनासिनवर विश्वास आहे. डॉक्टरांच्या बिनधोक औषधांसारखेच अनेक औषधींचे मिश्रण त्यात असते.

सर्दी-पडसे, फ्लू, डोकेदुखी, पाठदुखी, स्नायूदुखी आणि दातदुखी यांवर परिणामकारक.

प्रभावी आणि विश्वसनीय

## ॲनासिन

भारताचे अत्यंत लोकप्रिय वेदनाशामक



३
८

Regd. User of TM : Geoffrey Manners & Co. Ltd.

त्याच रात्री दोन रनसंना पिटाळलं. एकजण गेला मिकटिल्याकडं ह्या लाजिरवाण्या न् मर्मभेदी बातमीची कॉपी घेऊन त्याला पाठवलं होतं रंगूनला. हेडक्वार्टर्सला. डिव्हिजनल कमांडर शहानवाजखानकडे. चीफ–ऑफ-स्टाफ भोसल्यांच्याकडे. अन् एक व्यक्तिगत पत्र सरसेनापति नेताजींच्या-करता.

चव्वेचाळीस सालच्या मार्च महिन्यात सुरू झाली होती ही लढाई. दरम्यान बऱ्याच जय-पराजयाच्या बातम्या ह्या मंडळींना मिळाल्या होत्या. पण मला वाटतं, ह्या बातमीला काही तोडच नव्हती! ही सर्वात वाईट बातमी होती! एकदम चार आझाद हिंद सैनिकांनी स्वेच्छेनं असा विश्वासघात करावा! सूर्याजी पिसाळ, मीरजाफर, उमीचंद ह्यांची औलाद अजुनी जीवंतच आहे!

आणखीएक कूरियर पिटाळला गेला. दुसऱ्या पायदळी तुकडीचे कर्णधार मेजर पी. के. सैगलांच्याकडे. आपली गुप्त योजना विश्वासघातक्यांनी चोरून शत्रूकडे नेलीय्, हे त्यांना कळवायलाच पाह्यजे की!

रात्र संपता-संपता अन्वर परत शेडमधे आला. आदल्या रात्री रियाज काय काय म्हणत होता ते सगळं मेजर धीलनना सांगून तो आला होता.

दुसऱ्याच दिवशी आमच्या काही तुकड्यांनी ताउंगजिन् न् शादीच्या टापूत जायचं असं ठरलं होतं. पण आता आम्हाला ही योजना पुरती बदलून टाकावी लागली. कारण आधीच्या सगळ्या योजनेची बित्तंबातमी शत्रूला एव्हाना लागून गेली होती.

मार्चच्या पहिल्या आठवड्यात वेगवेगळ्या आघाड्यांवरनं एकामागोमाग एक काळीज फाडून टाकणाऱ्या बातम्या येत राह्यल्या. ह्या विश्वासघाताची गोष्ट प्रत्येकच युनिटला कळवण्याइतका वेळ नव्हता हातात. ज्यांना ही बातमी वेळेवर मिळाली नाही, ते अचानक हल्ला करायला म्हणून गेले अन् अनपेक्षितपणानं मृत्युमुखी पडले! आपल्या गुप्त मोहिमेची बातमी शत्रूला कशी काय लागली, हेही त्यांना मरायच्या आधी कळू शकलं नाही!

अन्वर म्हणाला होता की, ही लढाई जर आपण जिंकली, तर ह्या रियाज, मदन, शर्वर* न् दे ह्यांचं कोर्टमार्शल होईल! ह्या लालकिल्ल्यातच आपण त्यांच्यावर खटला भरू! कोणतेही ज्यूरी त्यांना मृत्यूचीच सजा देतील! ह्या काही दिवसांत आपल्या जवळपास अडीचशे लोकांनी प्राण गमावलेय्त! त्यांच्या मृत्यूचा सूड तेव्हा घेता येईल आपल्याला!

आणखी एका आठवड्यानंतर आमच्या नव्या मोहिमेच्या योजनेनं पुरता आकार घेतला. परत एकदा आम्ही मेजर धीलनच्याभोवती गोल

* जाताजाता : लालकिल्ल्यातल्या खटल्यात शवरच्या नावानंपण समन्स निघालं होतं. तो आला होताही. आरोपी म्हणून नाही! फिर्यादी पक्षाचा साक्षीदार म्हणून!

करून बसलो. तारीख लक्षात आहे माझ्या. पंधरा मार्च.

मेजर धीलन म्हणाले—आपण दोन्ही बाजूंनी एकाच वेळी हल्ला चढवायचा. पहिल्या तुकडीत दीडशे लोक असतील. ताउंगजिनच्या ईशान्येला एक छोटीशी टेकडी आहे. तिचं नाव आहे शादी. किमान एक बटालियन ब्रिटिश सैन्य आहे ह्या टेकडीवर. टेकडीवरनं आपलं ताउंगजिनचं ठाणं शत्रूच्या 'तोफांच्या टप्प्यात आहे. अन् ते तोफा डागून आपली माणसं मारताय्त. त्यामुळं त्यांना हाकलून लावून आपण ही टेकडी घेऊन टाकायला पाहुजे. हे फार धाडसाचं काम आहे. कारण आपण हल्ला चढवणार खालनं. निव्वळ दीडशे सैनिक घेऊन. अन् शत्रूनं बस्तान बसवलंय् टेकडीच्या माथ्यावर. त्यांच्याजवळ तोफा आहेत. अन् किमानपक्षी सहाशे सैनिक आहेत. तेव्हा ही मोहीम म्हंजे निश्चित मृत्यूच्या मुखात झेप घेण्यासारखंच आहे. पण ही टेकडी जर आपल्याला घेता आली नाही, तर न्यांगू-ताउगजिन-पोपा हा रस्तापण आपल्याला काही केल्या घेता यायचा नाही.

मेजर धीलन म्हणाले—ह्या धाडसी मोहिमेचं नेतृत्व करायची इच्छा तुमच्यापैकी कुणाला आहे ?

कॅप्टन खान महंमद तात्काळ उठून उभे राह्यले.

म्हणाले—दीडशे कॉम्रेड्सना नेतृत्व द्यायची मला इच्छा आहे सर! अर्थात आम्ही टेकडीवर ताबा मिळवू शकू का नाही, ते मला सांगता येणार नाही. पण टेकडीवर ताबा मिळवता आला नाही तर आमच्यातला एकही माणूस परत येणार नाही, एवढीच हमी मी घेतो !

मेजर धीलन जरा कां-कूं करत होते. कारण खान महंमद इथं नवीनच आलेले. इथले शिपायीगडी काही त्यांना धड ओळखत नव्हते.

पण मधेच मेजर जागीरसिंग म्हणाले—वा रे पठ्ठे! हे अगदी आझाद हिंद सैनिकासारखा बोललास तू !

मेजर धीलन राजी झाले.

मला नक्की ठाऊक नाही, पण कदाचित त्यांना वाटलं असेल—ही आहे एक आत्मघातकी मोहीम ! टेकडी घेणं निव्वळ अशक्य आहे ! आपल्या दीडशे सैनिकांच्या बदल्यात त्यांना शत्रूचे निदान दीडशे जीव हवे असतील ! त्याचमुळं कदाचित् कुण्या भरोशाच्या अन् कसलेल्या अधिकाऱ्याऐवजी ह्या नवख्या माणसाला ह्या आत्मघातकी मोहिमेचं नेतृत्व द्यायला ते तयार झाले असतील ! अर्थात् हा आपला माझा निव्वळ अंदाच आहे. अन् हा अंदाज सांगून बुलंद शूरवीर धीलनना काहीच कमीपणा द्यायचं माझ्या एवढंसंसुद्धा मनात नाही. प्रत्यक्ष रणांगणावर अशा गोष्टी सगळ्यांनाच कराव्या लागतात. कोणत्याही सेनापतीला हे निर्णय घ्यावेच लागतात.

निवडक दीडशे सैनिकांची तुकडी तयार करण्याकरता खान महंमद

लगेचच कामाला लागले. लेफ्टनंट अन्वर हुसेननंपण आपलं नाव नोंदवलं ह्या तुकडीत. माझीही तशीच इच्छा होती. पण माझं काही नशीब नव्हतं एवढं! दुसऱ्या एका मोहिमेत माझं नाव आधीच गेलं होतं.

शादी टेकडीवरच्या हल्ल्याच्या वेळीच आणखी तीन तुकड्या बनत होत्या. ए, बी न् सी कंपनी.

लेफ्टनंट कर्तारसिंगच्या नेतृत्वाखाली 'ए' कंपनीनं जायचं होतं ताउंगजिन टेकडीच्या दक्षिण अन् पश्चिमेच्या बाजूंचं रक्षण करायला. म्हंजे पोप्याच्या सडकेवर.

उत्तर अन् पूर्व अशा दोन बाजू सांभाळण्याची जिम्मेदारी होती 'बी' कंपनीवर. हे काम जास्ती जड होतं. कारण आम्हाला वाटतं होतं, शत्रूचं आक्रमण प्यिनबिन-काब्यूकडनं होईल. किंवा मग न्यांगूकडनं. ह्या दोन्ही वाटांची देखभाल 'बी' कंपनीकडे दिली. त्याचं नेतृत्व करायची जबाबदारी आली ग्यानसिंग बिशतवर. ग्यानसिंग खंदे वीर होते. सिंगापूरच्या लष्करी विद्यालयात ते शिकले होते. त्यांच्या तुकडीत फक्त नव्याण्णवजण होते. मलापण ह्याच तुकडीत घातलं. अन् आम्ही पुरे शंभर झालो.

आमच्यापैकी कुणाच्याच हातात भारी किंवा हलकी काय—मशिनगन नव्हती. शस्त्र म्हणायला फक्त रायफल न् संगीन.

खेरीज 'सी' कंपनी रिझर्व म्हणून खुद्द पोप्यातच राहणार होती.

दुसरा दिवस म्हंजे सोळा मार्च. खान महंमदच्या नेतृत्वाखाली दीडशे जणांची तुकडी शादी पहाडच्या मोहिमेवर निघून गेली. खान महंमदची अन् माझी ओळख थोडक्या दिवसांची होती. अन् अन्वरची अन् माझी ओळख फार दिवसांची होती. निरोप घ्यायच्या वेळी दोघांनीही मला अलिंगन दिलं. ह्या लढाईनंतर परत गाठ पडेल का नाही कोण जाणे!

त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हंजे सतरा मार्चला आमच्या 'ए' अन् 'बी' कंपन्या पोपा सोडून ताउंगजिनकडे जायला निघाल्या.

ह्या सोळा-सतरा मार्चला ताउंगजिन शादीचा टापू रक्तानं लालीलाल होऊन गेला होता.

एका तुकडीत मी होतो. अन् एका तुकडीत अन्वर होता. आधी अन्वरच्या तुकडीची गोष्ट सांगतो. सोळा मार्चच्या शादी टेकडीच्या लढाईची गोष्ट:

शादी टेकडी खरं म्हंजे फारशी उंच नव्हती. पाचेकशे फूट असेल. टेकडीच्या भोवतीचं टेकडीला चक्क वेढून एक ओढा गेला होता. त्या ओढ्यात पाणी नव्हतं आत्ता. खोल असेल पुरुषभर.

खान महंमदनी रात्रीतल्या रात्रीत आपल्या सैनिकांच्यासकट ह्या कोरड्या ओढ्याचा आसरा घेतला गुपचुप. ही टेकडी एकदम उंच होती. अन् टेकडीवर झाडंबिडं अजिबातच नव्हती.

सगळ्यात मुश्कील अशी होती की आमच्या सैनिकांच्या पायात बूट नव्हते. आधीचे बूट फाटून गेल्याला बरेच

दिवस झाले होते. अन् नवीन बूट काही त्यांना मिळले नव्हते. सगळे अनवाणीच लढायला आले होते. अन् टेकडी अशी खडकाळ होती की ह्या टेकडीवर अनवाणी चढणं फारच कष्टाचं होतं.

खान महंमदनी एक प्लॅटून टेकडीच्या पायथ्याशीच ठेवलं. ह्या प्लॅटूनचं नेतृत्व दिलं अन्वर हुसेनकडे. ह्यांची जबाबदारी अशी की माघारी फिरायची वाट त्यांनी मोकळी ठेवायची. ह्या प्लॅटूनमध्ये होती पंचवीस माणसं.

बाकीच्या सव्वाशे लोकांना घेऊन रात्रीच्या अंधारातच खान महंमदनी हळुहळू टेकडी चढायला सुरुवात केली. शत्रूला काहीच खबर लागली नाही.

जवळ जवळ अर्ध अंतर चढून गेल्यावर कुणाच्यातरी पायानं काही मोठाले दगड गडगडत खाली आले. त्या आवाजानं शत्रूला आमची चाहूल लागली.

लगोलग त्यांच्या तोफा गरजून उठल्या. पण खान महंमदचं टोळकं तोपर्यंत शत्रूच्या इतक जवळ येऊन ठेपल होतं, की तोफांचे गोळे ह्यांच्या डोक्यावरनं खाली पडायला लागले.

शत्रूकडं युद्धसामग्रीची काहीच चणचण नव्हती. टेकडीच्या माथ्यावर प्रखर प्रकाशाचे झोत दिसायला लागले. तोफा डागून काही उपयोग नाही हे ब्रिटिश कमांडरच्या लक्षात आलं होतं. लगेच मशिनगन्स चालवायचे हुकम सुटले.

पण तरी खान महंमदची आगेकूच काही थांबली नाही. गोळ्यांच्या वर्षावाला न जुमानता सगळे शत्रूनं खणून ठेवलेल्या खंदकांच्यासमोर आले.

मग खान महंमदनी बेयोनेट चार्जची ऑर्डर दिली !

आता जीव बचावायचा काहीच उपाय नाही असं पाहून शत्रूनं एस-ओ-एस पाठवला. 'छाऊ'ला असलेल्या त्यांच्या रिझर्व बटालियनकडे.

आमच्या सैनिकांनी संगिनी उंचावून खंदकात उड्या घेतल्या एकामागोमाग एक. हातघाईच्या लढाईत आमच्यासमोर त्यांचा निभाव लागणं शक्यच नव्हतं.

खंदकातनं बाहेर पडून ईशान्येच्या उतारावरनं त्यांनी पळून जायला सुरुवात केली.

थोड्याच वेळात तिकडनं जवळजवळ चारशे नवे सैनिक आले. इकडला एस-ओ-एस मिळाल्यामिळाल्या. त्यांनी खान महंमदच्या तुकडीची दोन बाजूंनी कोंडी केली.

आपली सबंध तुकडीच धोक्यात आलेली बघितल्यावर मग अन्वर हुसेननं पण आणखी वाट बघितली नाही. त्या पंचवीसही जणांनी एकदमच रायफली चालवल्या.

त्यामुळं शत्रू भयंकर घाबरून गेला. त्यांना वाटलं होतं, आपण ह्यांच्या सबंध तुकडीलाच घेरलंय्. अन् आता त्यांच्या घेऱ्याच्या बाहेरनं गोळ्या यायला लागल्यावर त्यांना वाटलं, की ह्यांची आणखी एक पुरती कंपनीच परत टेकडीवर गेली असली पाह्यजे.

आम्ही अवघे पंचवीसजण होतो, हे काही त्यांना कळलं नाही. ते संख्येनं फारच होते. अन टेकडीवर उर्ध राह्यला

फारशी जागा नव्हती. त्यामुळं त्यांची चांगलीच गर्दी जमल्यासारखी दिसत होती. सगळे दाटीवाटीनं उभे होते. त्यामुळं आमची एकपण गोळी वाया जात नव्हती.

अन् आमचे सैनिक असे चोहीकडे विखरून होते, की आमचं काहीच नुकसान होत नव्हतं. नीट नेम धरून गोळी सोडली नाही तर ती आम्हाला लागणं शक्यच नव्हतं.

अन्वर हुसेनचं टोळकं 'नेताजी की जय' अशी आरोळी देत वेगानं धावत येत होतं. संगिनी उंचावून न् गोळ्या झाडतझाडत. अणकुचीदार दगड लागून त्यांचे पाय रक्तबंबाळ झाले, पण त्यामुळं काही त्यांची आगेकूच थांबली नाही.

नेमक्या ह्याच क्षणी इतक्या वेळा-नंतर परत एकदा टेकडीवरची तोफ गरजली आता तिचं तोंड ब्रिटिश सैन्याकडे वळवलेलं होतं. आमच्या लोकांनी तोफ ताब्यात घेतली होती.

रात्री तीनपास्नं पहाटे पाचपर्यंत ही लढाई चालली. सरतेशेवटी आमच्या बाहेरच्या व्यूहांतन वाट काढून शत्रूचं सैन्य पळून गेलं.

खान महंमदनी शादी टेकडीवर ताबा मिळवला.

शहानवाजखाननी आपल्या आठव-णीत लिहिलंय्—आझाद हिंद सेनेनं ब्रह्मदेशात ज्या ज्या काही रोमहर्षक लढाया केल्या, त्यातलीच ही एक शादी-टेकडीची लढाई. आमच्या सैनिकांनी ह्या लढाईत असामान्य कर्तबगारी दाखवली होती. ह्या लढाईत शत्रुपक्षाचे किमान दोनशेजण तरी मारले गेले असले पाह्यजेत असा माझा तेव्हांच अंदाज होता. ब्रह्मी गुप्तहेरांनी नंतर हे खरंच आहे म्हणून सांगितलं. त्या मानानं आमचे अवघे सतराचजण आम्ही ह्या लढाईत गमावले.

पण शहनवाजखाननी हे लिहिलंय् ते आठवणीच्या भरोशानं. त्यांची डायरी रणांगणात सतरा मेला हरवली. ती ब्रिटीशांच्या हाती लागली. अन् नंतर लाळकिल्ल्याच्या खटल्यात ती दाखल केली गेली. ह्या डायरीवरनं असं दिसतंय् की आमचे काही सतराजण ह्या लढाईत कामी आले नव्हते. कामी आला होता अवघा एकजण! जखमी मात्र शहाऐंशी जण झाले होते.

March 16, 1945 : Khan Md. attacked Sadi and pt. 1186. He had fierce hand to hand fighting for 2 hrs. Inflicted at least 2000 casualties to the enemy. Fighting lasted from 0300 hrs. to 0600 hrs. Men fought gloriously shouting 'Netaji-ki-Jai!' Our casualties were 1 killed and 86 wounded. —Exhibit No. DDD of the Prosecution, INA Trial.

शादी टेकडीच्या माथ्यावर तिरंगी झेंडा फडकवून कॅप्टन खान महंमद न् अन्वर हुसेन सतरा तारखेला सकाळी हेडक्वार्टर्सला परत आले.

अर्थात् मी तेव्हा तिथं नव्हतो. मी होतो 'बी' कंपनीच्याबरोबर ताउंग-जिन आघाडीवर. शादी टेकडीपास्नं चारेक मैल वायव्येला.

[ क्रमशः ]


कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग
SATHE
MALTex
BISCUITS
भरपूर
माल्ट असलेली
भारतातील एकमेव बिस्किटें
साठे
माल्टएक्स
कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग।
साठे माल्टएक्स बिस्किटें
आणतात रंग॥
साठे माल्टएक्स बिस्किटांची
आगळीच रुची।
साठे माल्टएक्स बिस्किटें
कुरकुरीत, व ताजी॥

# असे साकारले शिल्प !

पुस्तके

## किशोरांना आवडतील अशा कथा

सौ. प्रमील कुलकर्णी यांचे हे तिसरे पुस्तक, किशोर वाङ्मयाकडे केवळ पैशाच्या दृष्टीने न पहाता संस्काराच्या दृष्टीने पहाणारे लेखक-लेखिका आणि प्रकाशक दिवसेंदिवस दुर्मिळ होत आहेत. पण नागपूरचे उदयोन्मुख प्रकाशक श्री. भा. ल. कुलकर्णी आणि या पुस्तकाच्या लेखिका यांचा असा योग जुळून आलेला दिसतो.

'असे साकारले शिल्प' या पुस्तकात सौ. प्रमील कुलकर्णी यांनी वीस प्रसिद्ध स्त्री-पुरुषांच्या जीवनांतील एकेका प्रसंगाची गुंफण केली आहे. या व्यक्तींच्या जीवनांतील हे प्रसंग असे आहेत. त्या त्या प्रसगामुळे ती ती व्यक्ती संपूर्ण बदलून गेली. कलिंग देशावरील स्वारीने सम्राट अशोक बदलला. 'सावधान' शब्दाने नारायणाचा रामदास झाला. बायकोच्या एका धारदार वाक्याने तुलसीदास रामभक्त कवी झाले.

ज्या व्यक्तींची निवड या पुस्तकासाठी केली आहे. त्या व्यक्ती विविध क्षेत्रांतील आहेत. व्यास–वाल्मीकी-सारख्या इतिहासपूर्वकालातील व्यक्ती येथे आहेत, तर महात्मा गांधींसारख्या विसाव्या शतकातील व्यक्तींही या पुस्तकात चित्रित केल्या आहेत. गौतम बुद्धांसारखे धर्मप्रवर्तक येथे आहेत, तर "प्रच्छन्न बौद्ध" आद्य शंकराचार्यही येथे आहेत. अहिल्याबाई होळकर आणि भगिनी निवेदिताही या पुस्तकात आहेत.

लेखिकेने या थोर व्यक्तींच्या कर्तृत्वाची सुरुवात कशी झाली याचे मनोज्ञ चित्रण केले आहे. तिची शैली किशोरासाठी जरा प्रौढ वाटली, तरी एकूण आकलन सुलभ आणि सुंदर आहे. पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी गांधर्व महाविद्यालय स्थापन केले यासंबंधात लेखिकेने लिहिले — 'भारतात नाद-ब्रह्माचे एक नवे प्रतिष्ठान निर्माण झाले.' नादब्रह्माचे प्रतिष्ठान ही सुंदर शब्दसंहती सहज आणि सुंदर वाटते.

शांतिनिकेतनच्या स्थापनेची गोष्टही त्यांनी सुरेख शैलीने सांगितली आहे.

संस्कार–कथांच्या दृष्टीने सम्राट अशोक, महात्मा गांधी, ज्योतिबा फुले, पंडिता रमाबाई, अ‍ॅनी सुलिव्हन यांच्या जीवनांतील ज्या 'प्रसंगाची चित्रणे' लेखिकेने केली आहेत, ती वैशिष्टयपूर्ण आणि परिणामकारक आहेत. मुलांच्या मनावर ठसा उमटावा, असेच त्या प्रसंगाचे सामर्थ्य आहे आणि लेखिकेनेही ते प्रसंग कौशल्याने रंगविले आहेत. 'नादब्रह्म' हे रेखाटन पं. पलुस्करांच्या जीवनातील एका प्रसंगाचे ते अतिशय परिणामकारक वाटते.

पण व्यक्तींची निवड आणि पुस्तकातील त्यांचा क्रम याबाबत अधिक दक्षता सहज घेता आली असती. व्यक्तिचित्रणाचा अनुक्रम कालानुरूप ठेवता आला असता किंवा संत, राजे, धर्मप्रवर्तक असेही भाग पाडता आले असते. त्याचप्रमाणे योगायोग आणि साक्षात्कार यापेक्षा कर्तृत्व आणि कौशल्य यावर भर देऊन व्यक्तिचित्रे रेखाटता आली असती. प्रस्तावनेचा अवजडपणाही कमी व्हायला हवा होता

तरीही किशोरांना आवडेल असेच हे पुस्तक आहे यात शंका नाही. शिवाय या आवडण्यातून त्यांच्या ज्ञानात भर पडेल. त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे शहरी जीवनाच्या अनिकेत वातावरणात त्यांच्या मनावर चांगले संस्कार हे पुस्तक करेल अशी खात्री वाटते. रंजन आणि संस्कार यापेक्षा किशोर वाङमयाचे दुसरे कोणते मूल्य आहे? या पुस्तकाने या दोन्ही गोष्टी साधणार आहेत. –प्रा. भी. रा. जहागीरदार

**'असे साकारले शिल्प'**
सौ. प्रमील कुलकर्णी
साहित्यप्रसार केन्द्र, नागपूर.
किमत ३ रुपये.

## एक घरंदाज घरगुती सोहळा
# स्वतंत्रते भगवती

---

**तुझ्याच गुणकिर्तना मातृभू आम्हा शब्द दे**
**तुझे स्तवन गावया मातृभू आम्हा सूर दे**

त्या दिवशी, म्हणजे ५ फेब्रुवारी ७३ यादिवशी संध्याकाळी ६॥ नंतर पुण्याच्या उद्यान प्रासाद कार्यालयातील वरच्या सभागृहात निवडक निमंत्रित आणि महाकवी ग. दीं. च्या समक्ष एक उमदा, तरुण कवी सुधीर मोघे आपल्या 'स्वतंत्रते भगवती' ह्या स्वतःच प्रकाशित केलेल्या काव्यसंग्रहातील वरील ओळी उत्कंठतेने निवेदन करीत होता आणि समोर ग. दी. माडगुळकर आणि सुधीरच्या पूर्वपरिचित काव्यगुणांनी भारावलेली अशी मंडळी जमली होती.

काही चांगले घडायला, सगळ्या चांगल्या वेळा जुळून याव्या लागतात. 'स्वतंत्रते भगवती' सारखी ओजस्वी आणि आशयपूर्ण काव्यसंग्रह प्रकाशीत व्हायला आधी एक हळुवार मनाचा,

खुल्या दिलाचा आणि राष्ट्रप्रेमाने भारावलेला कवी जन्मावा लागतो, मग त्याला हृदयाचा छेद घेणारा विषय गवसावा लागतो आणि सन १८५७ ते १९४७ ह्या प्रदीर्घ कालखंडातील स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख व्यक्तिमत्वे आणि काही घटनांचा मागोवा उत्कंठतेने मांडायला अचूक शब्द आणि ती आगळीच मन उचंबळून टाकणारी लय सापडावी लागते आणि इथे संपणारा प्रवास खऱ्या अर्थाने सुरू होतो.

ह्यानंतर सुरू होणारा काव्यसंग्रह प्रकाशनाचा खडतर जिकीरीचा प्रवास, निराश न होता केलेल्या अप्रतिम आशयाच्या हळुवार त्याचप्रमाणे ओजस्वी कविताचा...सुधीर मोघे, या तरुण कविच्या आयुष्यात बहुदा अशाच सर्व ऐतिहासिक वेळा जुळून आल्या होत्या.

भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवानिमित्त 'काहीतरी करून दाखविणे' पासून 'काहीही न करणे' पर्यंतच्या विविध कल्पना, संकल्प आणि आणि योजना चालू असताना, पुण्यात 'आपली आवड' ह्या नावाखाली जमलेली पुण्यातील काही तरुण कलावंत मंडळी १५ ऑगस्ट ७२ ला 'स्वतंत्रते भगवती' नावाचा, स्वातंत्र्य शिल्पकारांच्या गुणगान करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाच्या तयारीत मग्न होती. आपल्याकडे देशप्रेम ही सुद्धा प्रासंगिक भावना असल्याने इतका ओजस्वी, तरुण आणि चिरंजीव कार्यक्रम व्यावसायिकदृष्टया फार काळ टिकला नाही. असो–

पण मग ही सर्व मंडळी त्या दिवसानंतर ह्या पुस्तक प्रकाशनाच्या पाठीमागे लागली आणि त्या दिवशी तो सर्व मंडळी भारावलेल्या अंतःकरणाने.

"जय स्वतंत्रते, जय स्वतंत्रते  
जय स्वतंत्रते देवी,  
श्वासाश्वासातून सुगंधित तुझी स्मृति यावी  
भगवती स्वतंत्रते देवी"  
हा जयघोष करीत होती

किमान त्यांच्या निर्मळ, थोडयाशा दुर्मिळ आणि उत्कंठ राष्ट्रप्रेमाला ह्या पुस्तकाच्या रूपाने स्थैर्य, आशीर्वाद आणि प्रोत्साहन मिळाले तर मला व तुम्हाला एक हळुवार मनोहारी आणि उत्तुंग भावना जागविल्याचे पुण्य मिळेल असे वाटते.

आजकालच्या पुस्तक–प्रकाशनाच्या आधुनिकीकरण आणि तांत्रिक व कलापूर्ण रेखाटणीच्या सर्वतंत्रात पद्मा सहस्त्रबुद्धे ह्यांच्या अत्यंत शोभेशा मुखपृष्ठामुळे आणि देवीदास बागुलांच्या आकर्षक मांडणीमुळे हे पुस्तक आतील कवितांच्या अनमोल ठेव्याबरोबरच घ्यावेसे वाटते. पुस्तकास कवि कुसुमाग्रज ह्यांची आशीर्वादात्मक प्रस्तावना आणि पुस्तकाच्या प्रकाशनाला ग. दी. माडगूळकरांसारखाच तरुण भावनांचा महाकवि लाभणे म्हणजे हाच काय तो 'दुग्ध शर्करा, माणिक कांचन योग' असे म्हणावेसे वाटते.

–दीप

'रुझबूम' ही बोट दुभंगली आणि लाईफबोटीवर आश्रय घेतलेल्यांनी २६ दिवस अन्नपाण्याविना झुंज घेतली पण त्या शेकडो लोकांपैकी फक्त पाचच नशिबाने जिवंत राहू शकले.

# लाटांवरचे क्षणाचे सोबती

जिप्सी मधुकांत

अठ्ठावीस जणांच्या त्या बोटीत जवळ जवळ ८० माणसे परस्परांना खेटून उभी होती. मृत्यूच्या जबड्यातून बचावलेले आणखी ५५ जीव त्या लाईफबोटीला लटकून लाटांच्या माऱ्यावर आपले नशिब अजमावत होते.

९ मार्च १९४२ ला 'रुझबूम' ही बोट टोर्पेडोच्या माऱ्याने दुभंगली होती. सुमात्राहून नुकत्याच परतलेल्या त्या बोटीत ब्रिटिश लष्करी सैनिक तसेच नागरी अधिकारी, त्यांची बायकामुले, विस्थापित इ. बरीच गर्दी होती. 'रुझबूम'वर स्फोट होताच सारा हाहा:कार उडाला. समुद्राच्या लाटांवर तरंगणाऱ्यांनी मिळेल तो अवशेष पकडून जीव बचावण्याची धडपड सुरू केली.

### चमचाभर पाणी, चमचाभर दूध

बऱ्याच वेळाने थोडेसे स्थिरस्थावर झाले तेव्हा त्या बोटीत असलेला ब्रिगेडिअर आर्ची पॅरिस उभा राहिला. सारे जण मरगळलेले; पण तो कणखरपणे ताठ उभा राहून सर्वांना उद्देशून म्हणाला, 'आपल्या सोबत रुझबूमचा कॅप्टन आहे. त्याच्या आज्ञेत ही लाईफ बोट राहिल आणि शिस्तपालनाचे काम

माझ्याकडे. दुसरी मदत येईपर्यंत तुम्हा-सर्वांना सैनिक म्हणून मानाने वागवले जाईल. रोज सकाळी प्रत्येकाला एक मोठा चमचा पाणी आणि रात्री एक चमचा दूध मिळेल. बारा जणांनी बारा औंसाचा मांसाचा एक डबा रोज वाटून घ्यायचा आहे.' या प्रमाणे आर्चीने सर्वांना रेशन वाटपाची शिस्तही सांगितली. चमचाभर दूध आणि पाणी, एक औंस मांस रोजचा शिधा !

याशिवाय आणखी एक फतवा: ज्यांना विशेष इजा पोचलेली नाही, अशा प्रत्येकाने रोज सक्तीने चार तास बोटीला धरून पाण्यात लोंबकाळायचे आणि लोंबकळणाऱ्यांना, जखमी लोकांना बोटीत आसरा द्यायचा.

सगळ्यांचेच जीव वाचवायचे तर एवढी कडक शिस्त अगदी आवश्यक होती. मदत कधी येईल कोण जाणे? आणि लाटांबरोबर इतरही लोक लाईफबोटीकडे तरंगत येतच होते. त्यांची स्थितीही अतिशय केविलवाणी.

## मेजर कूरीची योजना

दुसऱ्या दिवशी मेजर नोएल कूरीने एक स्वयंसेवकाची योजना जाहीर केली. समुद्रात बरेच अवशेष, लाकडाचे तुकडे इ. आसपास तरंगत होते. ते गोळा करून चिंध्या-दोऱ्यांनी, समुद्रवेलींनी बांधून एक तराफा तयार करायचा. बऱ्याच हिकमतीने तगमगलेल्या जीवांनी तयार केलेला तो सांगाडा म्हणजे एक दिव्यच होते. त्यावर वीस माणसे जेव्हा उभी राहिली तेव्हा त्यांना कंबरभर पाण्यात उभे रहावे लागले, इतका तो तराफा खोल बुडाला ! तीन दिवसपर्यंत तो तराफा बोटीच्या मागोमाग जात होता. तराफ्यावरचा एकेक माणूस सटकत होता ! अखेर फक्त तेथे मेजर कूरीच एकटा उरला ! मेल्याहून मेला झाला होता. कॅप्टनने त्याला बोटीत घेण्याची आज्ञा केली. त्याच रात्री कूरीने जगाचा निरोप घेतला...

## संभ्रमातली स्वप्ने

भुकेच्या वेदना जीवघेण्या होत्या. त्याहूनही तहानेचे काय ? प्रत्येकजण कोरड्या ओठावरून दिवसभर जीभ फिरवत रहायचा. दिवसेंदिवस तेही करणे शक्तीबाहेरचे वाटू लागले. समुद्राचे पाणी प्यायचे नाही, ही आज्ञा होती. पण तहान असह्य होऊन अनेक जण ते पीत आणि बेशुद्ध पडत. सूर्याचे उन्हही खूप त्रासदायक वाटू लागले. होते नव्हते ते कपडे फाडून लोकांनी डोक्याला गुंडाळले पण समुद्राचे खारट पाणी जखमांना, फोडांना झोंबून लोकांचा त्रास अधिकच वाढला. आसपास नुसत्याच सागराच्या लाटा. अधून मधून दिसणारे जलचर. मदतीची आशा कुठेच नव्हती. अन्य कसले साधन नव्हते. किनाऱ्याचा पत्ता नव्हता.

प्रत्येकालाच संभ्रमाचे झटके येऊ लागले होते. काहीच्या काही बरळणे सुरू होते. कुणाला उडत्या बोटी दिसू लागल्या. कुणी ताजे पाणी म्हणून ओरडू लागले. सुग्रास अन्नाची स्वप्ने पडू लागली. बोट हेलकावे खात चालली होती. दिशा कळत नव्हती आणि हळू हळू सलोख्याचे वातावरणही नष्ट होऊ

लागले. सर्वजण एकमेकांवर पाळत ठेवू लागले. शिध्यावर लक्ष ठेवू लागले. पण पाळत ठेवणाऱ्यांवर निगराणी कोण ठेवणार? एकाला पोहता येत नव्हते म्हणून लाईफबेल्ट दिला होता; पण तो मग दुसऱ्याला द्यायला तयारच होईना. मग त्याच्याकडून हिसकून घेऊन दुसऱ्या गरजूला द्यावा लागला.

बोटीवरची माणसे गायब होऊ लागली. पण ती कुठे गेली, काय झाले, याची वास्तपुस्त करायचे त्राणही कुणाच्या अंगी राहिले नव्हते. प्रत्येक जणच बळी बनला होता. संभ्रमाचा.

## पंचायतन

बोटीवरच्या पाच जण लोकांनी एक कंपू बनवला होता. त्यांचे लक्षण काही ठीक दिसत नव्हते. एके दिवशी वादळ झाले. त्या रात्री पुष्कळ ओरडा ऐकू आला दुसऱ्या दिवशी सुमारे वीस माणसे गायब झाली. आम्हाला त्या पाचकड्या कंपूचा संशय आला. निश्चितच, प्रत्येकजण गेला तरी ते टिकून राहण्याची धडपड करणार होते त्यांनी आपसात कट केला होता. दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत होती. एके दिवशी ब्रिगेडिअर आर्ची ने अखेरचा निरोप घेतला. त्याला समुद्रात मुठमाती देताना अनेकांना कळवळून आले. काहींनी प्रार्थना म्हटल्या.

मग मात्र दिवस कठीणच होते. कॅप्टनला एका इजिनिअरने भोसकले. रेशनवर डल्ला मारून तो खुनी हातात चाकू परजत होता. कुणी त्याच्याकडे धावले, तेव्हा त्याने बोटीवरून समुद्रात उडी टाकली.

## क्षणाचे सोबती

बोटीवरचा शेवटचा पाण्याचा थेंब संपला कुणातच त्राण नव्हते. मदतीची आशा नव्हती. ज्यांचे चित्त ठिकाणावर होते त्यांनी मात्र देवाचा धावा सुरू केला. आणि त्या तेवढ्या हलकल्लोळातही एक बायबल त्या बोटीत कुणापाशी तरी सापडले. तोवेळपर्यंत जवळपास तीसच लोक बोटीत शिल्लक राहिले होते. आणि एकेक जण वरची वाट धरू लागला तेव्हा त्या पाच जणांच्या गँगला चेव आला. त्यांनी वेळवखत पाहून हल्ला सुरू केला

एके दिवशी पाऊस पडला! आ वासून ते पाण्याचे थेंब लोकांनी प्राशन केले. काही समुद्रपक्षीही दिसले. त्यातले बोटीवर येऊन बसले त्यांचा फडशा पाडण्यात आला! पावसाच्या पाण्याने रिकाम्या बाटल्या भरून घेतल्या.

त्यानंतर अनेक दिवस लोटले. बोटीशी आदळणाऱ्या लाटांचा तेवढा आवाज ऐकू येत असे. कुणीच बोलत नव्हते, हालत नव्हते. त्या दुष्ट पाचांपैकी दोघेजण ठार झाले होते उरलेल्या तिघांबद्दल मात्र विश्वास नव्हता

## अंधारापलीकडली गडद रेषा

अखेर ते तिघे आणि वॉल्टर गिल्सन आणि डोरिस लिम एवढेच पाचजण बोटीवर शिल्लक राहिले होते. आदल्या दिवशीपर्यंत रोज कुणी ना कुणी कमी होत होते. एकदा पहाटे त्या तिघांपैकी एकाने वॉल्टरला हलवले, समोर पहा म्हणून खुणावले.

एक अंधुक रेषा. अंधारापेक्षाही

गडद रेषा समोर दिसत होती! जमीन!! पण तोही संभ्रम असावा का? सव्वीस दिवस ती लाईफबोट भरकटत होती. सुमात्रापासून पश्चिमेला साठ मैलांवर असलेल्या सिपोरा बेटाचा किनारा समोर दिसत होता! ते एक मलायी खेडे होते. भुताहूनही भयानक दिसणारे ते तेथे उतरले. ते जिवंत होते!! पलीकडे जपानी सैनिक उभे होते....युद्ध संपेपर्यंत मग जपान्यांचा पाहुणचार स्वीकारायचा होता.

● ● ●

---

# माणूस

## मालकी व तत्संबंधित इतर तपशीलाचे निवेदन

(अधिनियम ४, नियम ८ अन्वये)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ : | पुणे |
| २. प्रकाशन काल : | साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव, पुणे ३० |
| ४. नागरिकत्व | भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या भागीदारांची नावे पत्ते | राजहंस प्रकाशन<br>१. ब. मो. पुरंदरे<br>१०२५ सदाशिव, पुणे ३०<br>२. श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव, पुणे ३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

प्रकाशकाची सही

दिनांक ३ मार्च १९७३ श्री. ग. माजगावकर

## मुक्काम दहिवडी

[ पृष्ठ १० वरून ]

विधानसभेच्या निवडणुका झाल्या. जीवनातील प्रश्न अधिकच बिकट होत असताना सर्वंकष दुष्काळ पुढे ठाकला. सतत काम मिळणे, कालव्यांची, तलावांची व शेती सुधारणांची कामे हाती घेणे, वेळेवर व योग्य दराने मजुरी मिळणे, कामावर सोयी होणे, धान्य वेळेवर व पुरेसे मिळणे इत्यादी प्रश्नांवर गेल्या महिन्यांत परिषदेमार्फत लढे झाले. दहिवडी अधिवेशनाची ही पार्श्वभूमी.

अधिवेशनाचे दोन भाग होते. प्रतिनिधींची भाषणे व खुले अधिवेशन. तेवीस जिल्ह्यातील सुमारे पाच हजार स्त्री-पुरुष प्रतिनिधी आले होते. दुष्काळी कामावरील मजुरांनी प्रत्येकी पंचवीस पैसे वर्गणी काढून या प्रतिनिधींना अधिवेशनाला पाठविले. प्रतिनिधींच्या भाषणांचा दुष्काळ हा केंद्रबिंदू असणार हे उघड होते. गेले दोन-चार महिने वृत्तपत्रात वाचलेल्या घटना व किस्से ऐकायला मिळाले. प्यायला पाणी नाही, जनावरांना चारा नाही, कामाचा अपुरेपणा, हत्यारांची कमतरता, मजुरीचे अल्प दर, धान्य पुरवठ्यातील कपात, वैद्यकीय मदतीचा अभाव, निवाऱ्याची व्यवस्था यासंबधीत प्रतिनिधींनी गाऱ्हाणी मांडली. शेतीला उपयुक्त अशी कामे करण्याऐवजी खडी फोडण्याची व त्यातून स्वतःचे डोळे फोडण्याची शिक्षा का देतात हे त्यांना कळत नाही. तसेच एकदा रस्ता बांधल्यावर परत तो फोडून नवीन बांधण्याच्या कल्पनेमागील रहस्यही समजत नाही. कंत्राटी कामावर काम करताना, कंत्राटदाराचा हिस्सा जाऊनही साडेतीन रुपये मजुरी मिळते पण सरकारी कामावर मात्र अडीच रुपये मिळतात हे कोडेही त्यांना उमगत नाही. या मंडळीतून हिंडल्यावर चटकन लक्षात येते की, अन्यायाचे निवारण हिंसाचाराशिवाय होणार नाही ही भावना यांच्यात दृढमूल होत आहे. वशिलेबाजी, अधिकाऱ्यांची मधल्यामधे खाबूगिरी या प्रकारांनी काही कोवळी मने मात्र पोखरून गेली आहेत.

कॉलेजच्या तिसऱ्या वर्षातील एक युवक. नगर जिल्ह्यात याला मुकादमाचे व प्रसंगी खड्डे खणण्याचे काम करावे लागते.

'पण यात कमीपणा का वाटतो?' —सगळं आयतं मिळणाऱ्या पांढरपेशा मुखातून बुळबुळीत झालेला हा प्रश्न टपकतोच.

'कमीपणा वाटत नाही. पण वाईट मात्र वाटते आणि ते याचे की केवळ अधिकाऱ्यांच्या कोंबड्यांची सोय भागवू शकणारे, माझ्याच वयाचे पण शिक्षणाचा गंध नसणारे अनेकजण माझे वरिष्ठ म्हणून काही काम न करता पाच रुपये रोजावर मिरवतात. मला मात्र कष्ट करून दोन रुपयेच मिळतात.'

प्रतिनिधीत हिंडताना आणखी एक अनुभव आला. 'माणूस'चे नाव उच्चारल्यावर भुवया विस्फारल्या

जातील असं वाटलं होतं. पण परिणाम उलटा व्हायचा. 'माणूस 'बद्दल प्रत्येकात आपुलकीच दिसून आली. गेल्या दोन अधिवेशनांचे वृत्तांत फक्त 'माणूस' मध्येच आल्याबद्दल त्यांनी धन्यवाद दिले.

दुपारच्या खुल्या अधिवेशनातील प्रमुख भाग म्हणजे अध्यक्ष दत्ता देशमुख यांचे भाषण. ते म्हणाले, 'दुष्काळ ही खरी आपत्ती. पण मी महाराष्ट्राचे थोर भाग्य समजतो की आज महाराष्ट्राच्या कष्टकरी जनतेला संबंध देशाच्या कष्टकरी लोकशाहीवादी समूहांच्या दृष्टीने देशाच्या समस्या सोडविण्याची नवी वाकोरी पाडण्याचे भाग्य या दुष्काळामुळे लाभत आहे. कुंतीने देवाची प्रार्थना केली, देवा दुःख दे, दुःख देशील तर तुझी आठवण होईल. संकटामुळेच पांडवाची एकी टिकली व त्यांना पराक्रमाला वाव मिळाला. आपण दुःखी आहोत आणि कुंतीच्या भाषेत जुटीचा देव आपल्याला भेटला आहे. महाराष्ट्रातील हा दुष्काळ आज देशाच्या प्रगतीच्या मूळ तत्त्वाचा प्रश्न सोडविण्याचे महाभारत घडविणार आहे.

'दुष्काळ म्हणून जे भोग आपणास भोगावे लागतात ते निसर्गाच्या करणीमुळे नाहीत तर ते मानवाच्या करणीमुळे आहेत आणि हा मानव म्हणजे आजचा राज्यकर्ता वर्ग, त्याचा पक्ष, त्याचे सरकार. दुष्काळ लढवणे म्हणजे अगदी राजकीय व सामाजिक लढा लढविणे आहे आणि तो लढविला तरच हा महाराष्ट्रातील ग्रामीण कष्टकरी निसर्गाशी दोन हात करेल.

दत्ता देशमुख हे शिक्षणाने इंजिनिअर, असून शेतीतील 'मास्टर' समजण्याइतके त्यांचे कर्तृत्व आहे. सरकारच्या नियोजनशून्य शेती धोरणाचे वाभाडे काढून देश सुजलाम्-सुफलाम् करण्याचे मार्ग त्यांनी सांगितले.

'सध्या आपणापाशी आहेत त्या साधनांनीसुद्धा आपण जास्तीत जास्त उत्पन्न काढू शकतो. पण त्याकरता आपल्याला देशापाशी असलेले स्वतःचे भांडवल मोकळेपणाने, नफ्यातोटयाचा विचार न करता वापरले पाहिजे आणि असे भांडवल म्हणजे आपल्या अफाट समाजाची श्रमशक्ती. सर्वप्रथम शेती आघाडीवरील संबंध बदला आणि श्रमशक्तीच्या मुक्त वापराला वाव द्या.

'महाराष्ट्रात कृष्णेच्या, गोदावरीच्या, तापीच्या खोऱ्यातून लांब दूरवर पसरलेली काळीशार जमीन आहे. विदर्भाचा लांबच लांब जमिनीचा पट्टा मऊसूत जमिनीचा आहे. माणूस पेरला तर माणूस उगवणारा. या भागात साधारणतः पाऊस पडतोच. महाराष्ट्राच्या जमिनीला जसा निचरा आहे तसा क्वचित् अन्य ठिकाणी आढळेल. महाराष्ट्रात पश्चिमेला असा डोंगरपट्टीचा भाग आहे की, तेथे पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याचे काय करायचे असा खरा प्रश्न असावयास हवा. पण गंमत अशी की पावसाने दगा दिला तर सोळा आणे पीक चार आण्यावर येते. हे पाणी साठवू शकलो तर पीक सव्वा रुपयावर जाईल. पण नियोजनपूर्वक श्रमशक्ती

वापरण्याचा हा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील नद्यांना भर पावसाळ्यात पूर येतात. या पुराचे पाणी खेचून पाण्याचे साठे करण्याची शक्यता आहे. सरकारी पाणी बारमाही वापरण्याऐवजी दोन हंगामी पिकांकरीता वापरले आणि भूगर्भातील पाणी बारमाही पिकांकरीता वापरले तर वक्तशीर, खात्रीशीर पाणी पुरवठ्याखाली कितीतरी जास्त जमीन आणता येईल. पाटांना सिमेंटचे अस्तर दिले, फवाऱ्यांनी पाणी पाजले, सिमेंटच्या नळातून दूरवर विद्युत् शक्तीच्या सहाय्याने पाणी पुरवले तर पाण्याची शाश्वती लाभेल. एवढेच नाही तर काही पूरक धंदे सुरू करता येतील. जमिनीत आकाशातून पडणारे पाणी मुरण्याकरिता, जमीन एका पातळीत आणणे, उतारावर जमिनी पायरी-पायरीने बांधून काढणे, नाल्यांना बंड घालणे, शेतीची बांधबंदिस्ती करणे अशा कितीतरी मार्गांनी दुष्काळाशी आपण झगडू शकतो.

'दुष्काळी काम म्हणून आपण रस्ते बांधणार आणि ज्यांच्याजवळ वहातूकीची साधने आहेत, ते त्यावरून फिरणार, हे असे उलटे गाडे यापुढे चालणार नाही. दुष्काळी कामे निसर्ग फुलवणारी कामे काढा असा आदेश देण्याची आणि तो अमलात आणण्याची ताकद समाजाजवळ आहे. या कामात आड येणाऱ्यांना बाजूला करण्याचा अधिकार जनतेला आहे. क्रांती म्हणजे खून नव्हे, तर सामाजिक बदल. बंदुकीच्या जोरावर जे अशा बदलाच्या आड येतात त्यांना त्यांच्याच मार्गांनी बाजूला करण्याचा अधिकार जनतेला आहे.'

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. वि. म. दांडेकर या अधिवेशनाला मुद्दाम उपस्थित होते. ते म्हणाले, 'गेल्या दहा वर्षांत २५ टक्क्यांनी लोकसंख्या वाढली. वाढलेल्या लोकसंख्येचा भाग कारखान्यात सामावला जावा अशी अपेक्षा होती; पण २५ टक्क्यांपैकी फक्त १५ टक्क्यांनाच काम मिळाले. त्यातील फक्त २ टक्के कारखान्यात गेले व १३ टक्के शेतीत. त्यामुळे शेतीवर भार वाढला. शिवाय संख्या वाढली ती भूमिहीन मजूरांची. जमीन असणारांची संख्या फक्त २–३ टक्क्यांनी वाढली. हे व मजुरी वगैरेचे प्रश्न कायमचे आहेत. त्यामुळे पाऊस पडला तरी थांबून चालणार नाही.

'गरीब म्हणून तुम्हाला मदत मिळणार नाही. तुम्हाला संघटित झालं पाहिजे. सरकारने रोजगारहमीची योजना केली. शिरगणती केली. ती अजून कागदावर तरी आहे. उद्या पाऊस पडल्यावर कुणी म्हणाले की, आता घरी जा, तर ऐकायचे नाही. सरकारला तुम्ही सांगू शकता की काम द्या नाहीतर पैसे तरी द्या. यासाठी गावोगाव शेतमजुरांचे संघ स्थापन करा व ही योजना राबवून घ्या. गाव सोडायची तयारी ठेवा. रस्त्यात आणि रानातच काम पाहिजे अशी इच्छा धरू नका. स्वतःस शिस्त लावा आणि काम चोख करा. फुकट कसं मिळेल या हेतूने संघटना उभारली तर ती टिकणार

नाही आणि अशी संघटना गरीबांना परवडणारही नाही.'

नंतर पुण्या-मुंबईच्या कामगार नेत्यांची शेतमजुरांना दिलासा देणारी भाषणे झाल्यावर अधिवेशनाचे सूप वाजले. अधिवेशनात ठराव वगैरे काही झालेच नाहीत. एकच 'ठराव' झाला तो म्हणजे ठराव करण्याचे अधिकार कार्यकारीणीला देण्याचा!

या अधिवेशनातून साध्य काय झाले ते माहित नाही, पण एक मात्र जाणवले की आतापर्यंत दुर्लक्षिला गेलेला व संपूर्ण विस्कळीत असा एक प्रचंड समुदाय संघटीतपणाचा आकार घेत आहे. दहिवडीसारख्या एका आडबाजूच्या ठिकाणी महाराष्ट्रातील पाच हजार प्रतिनिधी अडीअडचणींना तोंड देऊन व धमक्यांना भीक न घालता आपली दोन दिवसांची मजुरी बुडवून आले हे याचेच द्योतक होय. 'उठाव झेंडा बंडाचा' या शब्दांनी स्फूर्ती घेऊन व नेत्यांना 'आता आम्हाला मागे जायला सांगितले तर आम्ही तुमच्यावर उलटू' अशी प्रेमळ धमकी देऊन हे प्रतिनिधी परतले.

● ● ●

## सप्रेम नमस्कार : पृष्ठ ४ वरून

**१७ फेब्रुवारीच्या अंकात चंद्रशेखर मराठे यांनी लिहिलेल्या लेखाला अनिल बर्वे यांनी दिलेले उत्तर**

□ महर्षी मराठे,

आपण योगसाधनेने अंतर्ज्ञानी झाला आहात हे मला माहीत आहे. कारण तुमची नि माझी कधीही तोंडओळख नसताना—आपला कधीही पत्रव्यवहार नसताना—तुमचा माझा दूरान्वयेही कधीही कोठेही संबंध आला नसतानाही तुम्ही माझ्यावर बरेच आरोप केले आहेत. उदा.

'मी बेजबाबदार आहे, मला वैचारिक देवघेवीची सवय नाही, मला राज्यशास्त्र, अर्थशास्त्र याची तोंडओळख नाही, माझ्या विचारात विसंगती आहे, माझे मन पांढरपेशे, कचखाऊ व टेंभा मिरवणारे आहे माझा लोकशाही, समाजवाद, साम्यवादाशी काही संबंध नाही.'

माननीय महर्षी चंद्रशेखर मराठे, तुम्ही माझेवर केलेले आरोप 'जबाबदारपणेच' केले आहेत असे मी गृहीत धरतो. तुम्हाला मी 'बेजबाबदार' म्हणणार नाही. कारण मी एक सभ्य नि सुसंस्कृत गृहस्थ आहे कोणाशी पुरती ओळख नसताना त्याचेविषयी मी बेजबाबदार विधाने करीत नाही. म्हणून तुम्ही माझे विषयी सर्व विधाने जबाबदारीने केलीत असे मी गृहीत धरतो——

आता प्रश्न असा उरतो की तुमची माझी पुरती तोंडओळखही नसताना तुम्ही माझेवर एवढे भरमसाठ व्यक्तिगत आणि विनाकारण आरोप कसे काय करू शकलात? मला वाटते. माझ्या-

विषयी एवढी माहिती केवळ अंतर्ज्ञाना-नेच तुम्ही प्राप्त केली असावीत. तेव्हा 'अंतर्ज्ञानी महर्षी चंदशेखर मराठे' तुम्हाला माझे लाख प्रणाम !

महर्षी मराठे,

आता तुम्ही उपस्थित केलेल्या मुद्द्यांविषयी. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, यांचा सखोल अभ्यास करून माझ्या 'बारा जाहीर सवालांचे' जे आपण जाहीर खंडन केले त्यामुळे माझ्या अंत:चक्षूसमोरील अंध:कार नष्ट होऊन दिव्यज्ञानाने मी पूनित झालो. महर्षी मराठे, तुमचे सर्व विचार मला मान्य आहेत—इतकेच नव्हे तर 'व्यापक भूमिकेतून' मला सर्व विचार मान्य आहेत. उदा.

'या देशात लोकशाही आहे काय ? हे बारा नाट्यपूर्ण जाहीर सवाल विचारायला बर्वे जिवंत राहिले. म्हणजेच या देशात लोकशाही आहे.'

—इति चंद्रशेखर,

'व्यापक भूमिकेतून' हा विचार मला तंतोतंत मान्य आहे. आणि म्हणूनच माझे आणखीन काही नवीन विचार—

याह्याखान लोकशाहीवादी होता—कारण शेख मुजिबूर रेहमान जिवंत आहे. ब्रिटिश सरकार लोकशाहीवादी होते—कारण टिळक, गांधी, नेहरू जिवंत होते. औरंगझेबही लोकशाहीवादी होता—कारण कैदेत शिवाजी जिवंत होता खरंच, मराठे ऽ मराठे ऽऽ किती उदार-मतवादी हो तुम्ही !

'या अवाढव्य, निरक्षर देशात प्रौढ मतदानाद्वारे पाच निवडणुका झाल्याचे बर्वे यांच्या कानावर नाही काय ?'

—चंद्रशेखर उवाच

महर्षी मराठे ऽ मराठे ऽऽ

माझा जन्म स्वातत्र्योत्तर काळात झाला. तुमचा तर स्वातंत्र्यपूर्व काळात झाला आहे. तेव्हा स्वातंत्र्यपूर्व काळा-तही निवडणुका झाल्या हे तुमच्या कानावर असेलच. तेव्हा माझे काही नवीन विचार—

—स्वातंत्र्यपूर्व काळात निवडणुका होत होत्या, म्हणजेच ४७ सालाआधीही या देशात लोकशाही होती.

—ॲरिस्टॉटल, प्लेटो यांचे काळात पॅट्रिशियन्सही निवडणुका घेत होते. म्हणून त्या काळातही संसदीय लोक-शाही होती.

'लोकशाही विचारधारेने पूर्वीच्या सर्व राजवटींशी यशस्वी मुकाबला केला व शस्त्राला लोकशक्तीचे दास बनवले. मानवी जीवनात लोकशाहीचे परिवर्तन केले ते हे.' (चंद्रशेखर उवाच)

अंतर्ज्ञानी मराठे, तुमचा हा ही मुद्दा मला तंतोतंत मान्य आहे आणि म्हणून काही नवीन समीकरणे—

—भारतीय जनतेवर ब्रिटिश साम्राज्यशाहीने नव्हे, तर ब्रिटिश लोकशक्तीने अत्याचार केले. कारण ब्रिटनमध्ये लोकशाही होती.

—अल्जेरियन जनतेवर फ्रेंच साम्राज्यशाहीने नाही, तर फ्रेंच लोक-शक्तीने अत्याचार केले. कारण फ्रान्स-मध्ये लोकशाही आहे.

—व्हिएतनामी जनतेवर अमेरिकन साम्राज्यशाहीने नव्हे, तर अमेरिकन लोकशक्तीने अत्याचार केले. कारण अमेरिकेत लोकशाही आहे.

आणि म्हणून

सर्व साम्राज्यवादी लोकशाहीवादी असल्याने त्यांनी केलेले अत्याचार हे त्या देशातील लोकशक्तीने केलेले अत्याचार होत.

चंद्रशेखर ऽ चंद्रशेखर ऽऽ

काय अफलातून फिरकी टाकली हो तुम्ही !!

'अनिल बर्वे यांना राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, या देशाचा इतिहास थोडा माहीत असणे आवश्यक आहे.'

(चंद्रशेखर उवाच)

—अगदी बरोबर. मी तुरुंगामध्ये दीड वर्षे आणि त्या आधी पाच वर्षे जी पुस्तके वाचली ती केवळ कामकथांचीच होती आणि महर्षी मराठे, 'सांगी वांगी' थॉमस जेफरसनपासून माओ-त्से-तुंगपर्यंत सर्व क्रांतिकारक व प्रति-क्रांतिकारकांचे जे विचार मी ऐकले त्यावरून महर्षी मराठ्यांइतके ज्ञान त्यापैकी कोणालाच नव्हते.

अरेरे ! अरेरे !! अरेरे !!!

अंतर्ज्ञानी मराठे, आजपर्यंत जे अर्थ-शास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इति-हास याविषयी विचार मी ऐकले ते सर्व टाकाऊ होते. कारण 'सत्यज्ञान' केवळ तुमच्यापाशीच आहे. तेव्हा—

अंतर्ज्ञानी महर्षी मराठे, सत्यज्ञानाचे प्राप्तीसाठी मी आपला चेला होऊ इच्छितो.

बर्वे यांचा लोकशाही, समाजवाद, साम्यवाद वगैरे राजकीय तत्वज्ञानाशी काडीचाही परिचय नाही.

—(चंद्रशेखर उवाच).

महर्षी चंद्रशेखर, काय परफेक्ट मुद्दा मांडलात हो तुम्ही. महाराष्ट्र सरकारने अनिल बर्व्याला जे दीडवर्ष तुरुंगात टाकले ते त्याचा साम्यवादाशी संबंध असल्याबद्दल नव्हे तर, पुण्यातल्या पोरीबाळींच्या टिंगली केल्याबद्दलच तुरुंगात टाकले होते.

चंद्रशेखर ऽ चंद्रशेखरऽऽ हा महत्वपूर्ण शोध लागल्यावर तुम्ही युरेका युरेका म्हणून नाचलात की नाही ?

...जनतेपासून दूर जाण्यात व खूप गुप्तपणे खलबते करण्यात सर्व क्रांति-कारत्व सामावले आहे असा त्यांचा भ्रम आहे. —(चंद्रशेखर उवाच)

अहो, अंतर्ज्ञानी केवढे शंभर नंबरी सत्य लिहिते झालात हो तुम्ही ! आज मला कळले की, भूमीहीन संथाळात वर्षो न वर्षे काम करणारा चारु मुझूम-दार जनतेपासून दूर पळाला होता. विधानसभेतील आमदारकीचा राजी-नामा देऊन वरंगळच्या खेड्यापाड्यातून जाणारा नागी रेड्डी हा जनतेपासून दूर पळाला होता.

नागी रेड्डी, चारु मुझमदार हे जनते-पासून दूर पळालेले दिवाभीत केविल-वाणे, विनोदी क्रांतिकारक होते. आणि शहरात बसून मस्तपैकी सुखासीन जीवन जगत 'नथीतून तीर मारणारे' अंतर्ज्ञानी महर्षी चंद्रशेखर मराठे हेच खरे जनते-पर्यंत पोचलेले रणगाजी.

वाहवा ! वाहवा !! वाहवा !!!

...'राजकीय सत्तेचा व्यवच्छेदक विशेष जे सार्वभौमत्व ते फक्त सरका-रच उपभोगू शकते...न्यायसंस्था ही सरकारची एक सहाय्यभूत यंत्रणा आहे.

—(चंद्रशेखर उवाच)

अरे वा ! अरेच्चा !! असं का ?

छान छान.

महर्षी, हे मला माहीतच नव्हते. माझ्या अल्पमतीप्रमाणे सार्वभौमत्व हे केवळ संसदेला आहे—सरकारला नाही. म्हणूनच सुप्रीम कोर्टाचा निकाल विरुद्ध जाताच इंदिराजींनी आपल्या सरकारचा राजीनामा देऊन पुन्हा निवडणूका घेतल्या.

बिच्चाऱ्या इंदीराजी ! गुंगी गुडीया !!

अहो मराठे ऽ मराठे ऽऽ

तुम्ही भारताचे अॅटर्नी जनरल का हो नाही झालात ?

...' लोकशाही विचारधारा आर्थिक क्षेत्रातील परिवर्तनाचीही गरज ओळखीत आहे व त्यानुसार कायापालट करीत आहे. या तिच्या कायापालटालाच समाजवाद असे नाव आहे.

—(चंद्रशेखर उवाच)

अहो महर्षी चंद्रशेखर,

साठ सहस्र सगर पुत्रांची राख करणाऱ्या संतप्त मुनीपेक्षाही तुमचे तपःबल थोर म्हणायचे की हो. कारण युरोपच्या इतिहासाचे तुमच्या केवळ जिव्हालौल्याने शेण झाले.

अंतर्ज्ञानी, लोकशाही विचारांचा जन्म नि विकास तसेच समाजवादी विचारांचा जन्म नी विकास पुन्हा एकदा वाचा. लोकशाही ही भांडवलशाही कल्पना आहे. समाजवाद भांडवलशाहीच्या विरोधातून जन्माला आला. युरोपात लोकशाही असतानाच समाजवाद्यांची ससेहोलपट, कामगार संघटनांवर बंदी वगैरे प्रकार झाले. आज जे थोडेफार ' उदारमतवादी स्वातंत्र्य ' दिसते आहे त्यासाठी कामगारांनी आणि कम्युनिस्टांनी स्वतःच्या रक्ताचे सडे शिंपले आहेत.

' लोकशाही समाजवाद ' ही निव्वळ फसवणूक असून ' समाजवादी लोकशाही ' ही सत्य आहे. आधी समाजवाद तरच खरी लोकशाही. आजची तथाकथित लोकशाही म्हणजे भांडवलदारांची गटशाही नी निवडणुकशाही आहे. तुम्हाला लोकशाही-समाजवाद यातील फरक समजत नसेल तर एकदा चर्चेला या. समजावून सांगेन.

...' पोलिसांच्या मते बर्वे दोषी होते. तेव्हा बंदुकीच्या नळीचा हा कौल बर्वे यांनी स्वीकारणे अधिक निष्ठेचे ठरले असते. '—(चंद्रशेखर उवाच.)

अहो चंद्रशेखर, पांडित्याचा खोटा आव आणून अर्थाचा अनर्थ कशासाठी करता ? माओचा—' सत्ता ही बंदुकीच्या नळीतून जन्म घेते ' हा विचार पुरता कधी वाचला आहे काय ? का म्हणून संदर्भ विरहीत फेकाफेकी करता आहात ? माओचे विचार समजण्याआधी State and Revolution हे लेनिनचे पुस्तक वाचा. वाचणार असलात तर स्वखर्चाने फुकट पाठवीन. निदान ते पुस्तक वाचल्यावर शासनसंस्था म्हणज काय ते तुम्हाला कळेल. अहो मराठे, बंदुक जरी पोलिसांच्या हाती असली तरी ती वापरण्याचे स्वातंत्र्य त्यांना नाही. पोलिसखाते म्हणजे नोकरशाही कुत्रे आहे. डोळे उघडे ठेवून तुम्ही जर ' सोबत 'मधील मुलाखत वाचाल तर मी कोठेही पोलिसखात्यावर दोषारोप न करता सरकारवर टीका केली आहे—

[ मलपृष्ठ २ वर ]

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

**सप्रेम नमस्कार...**

पृष्ठ ५६ वरून

--आता तुम्ही म्हणाल 'टीका' करण्याचे स्वातंत्र्य आहे. हो आहे. आणि इतपत मर्यादित स्वातंत्र्य ब्रिटीशांच्या काळातही होते. म्हणूनच टिळकांची नी परांजप्यांची पल्लेदार लेखणी चालली.

--साखळीला बांधलेला कुत्रा भुंकू शकतो. म्हणून काही तो स्वतंत्र नसतो.

'--महान पत्रकार व क्रांतिकारक बर्वे! कोर्टात जे मिळते त्याला न्याय म्हणत असले तरी त्याला अजून क्रांती म्हणत नाहीत! (चंद्रशेखर उवाच)

--क्रांतीचे द्या सोडून. कोर्टात मिळाला तो न्याय मिळाला असे तरी मी कुठे म्हटले आहे? अंतर्ज्ञानी मराठे, कोर्टात आम्हाला न्याय मिळाला असे मी कुठेही लिहिल्याचे दाखवून दिलेत तर आपल्या चरणाचे तीर्थ घेईन.

--मराठेसाहेब, एक मात्र खरे हं. अनिल बर्वे महान पत्रकार व क्रांतिकारक आहे यात संशयच नाही. तुमच्या पूर्ण लेखात एवढे एकच वाक्य तुम्ही सत्य व विचारपूर्वक लिहिलेत आभार!

अंतर्ज्ञानी महर्षी मराठे,

कुरुक्षेत्रावर अर्जुनास भगवंताने ज्या प्रमाणे विराट दर्शन दिले. तद्वत तुम्हीही तुमच्या 'जबाबदार वृत्तीचे' तसेच तुमच्या समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या बाबतच्या अभ्यासाचे जे 'विराट दर्शन' दिलेत ते पाहून मीच नव्हे तर कोणीही नशापाणी न केलेला इसम थक्कच होईल.

महर्षी मराठे, तुम्ही माझ्या बारा जाहीर सवालांकडे इतक्या 'व्यापक नजरेतून' पाहिलेत की विश्वापुढे पृथ्वी नगण्य ठरावी त्याप्रमाणे तुमच्या व्यापक दृष्टिकोनात माझे 'बारा जाहीर सवाल' नगण्य ठरले. पुन्हा एकदा बारा जाहीर सवाल वाचा आणि त्याचे मुद्देसूद खंडन करायचा प्रयत्न जमल्यास करा. पण मला वाटते माझे बारा जाहीर सवाल तुमच्या मेंदूवरून गेले असावेत. आणखीन काय लिहावे? लिहावे तेवढे थोडेच आहे. पण जाता जाता एवढेच सांगतो,

--मराठे, तुम्ही जे माझ्याविषयी लिहिले ते 'आकसाने लिहिले नाही' असे तुम्ही म्हटले आहे. एक औपचारिकपणा तुम्ही पाळला एवढाच त्याचा अर्थ. वस्तुतः तुमचे सर्व लिखाण अत्यंत हीनगंडाने पछाडलेल्या, कम्युनिस्टद्वेष्ट्या, पी. एस. पी. वाल्याचे वाटते. आणि मला जे महत्व मिळाले-- (ज्यात माझे कर्तृत्व काही नाही असे मी स्पष्ट अनेकवेळा लिहिले आहे.) ते तुम्हाला सहन झाले नसल्याने विनाकारण व्यक्तिगत पातळीवर चारित्र्यहनन करण्यास 'वैचारिक देवघेवीच्या' नावाखाली तुम्ही उतरलात.

--अनिल बर्वे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर